CMYK

# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

१८३२






उत्सवी आनंद
उत्सवी ऑफर

0% घट*
जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर

५०% पर्यंत सूट*
सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर

१००% पर्यंत सूट*
हिऱ्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर



PNG
JEWELLERS

*अटी लागू. ऑफर १० ते २० एप्रिल २०२६ पर्यंत उपलब्ध.

UP TO ₹6,000 CASHBACK#
SBI card

#Min. Trxn.: ₹45,000; Max. Cashback: ₹6,000 per card account;
Validity: 17 Apr - 23 Apr 2026. T&C Apply.

जुना एम्प्लॉईमेंट चौक, व्हीआयपी रोड, सोलापूर – ९२२६५३२९०० ।
बारामती – ८३०८८१३७०५, सांगोला – ७०२८५००५००
अहिल्यानगर । श्रीरामपूर । छत्रपती संभाजीनगर । नांदेड । नागपूर । चंद्रपूर । लातूर । अकोला । नाशिक ।
सातारा । जळगाव । कोल्हापूर

टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com I info@pngadgil.com

INDIA I USA

## थोडक्यात...

### प्रियांका जय महाराष्ट्र करणार ?

मुंबई:नारी शक्ती वंदन विधेयकावरून संसदेत घडलेल्या अभूतपूर्व घडामोडींनंतर आता त्याचे पडसाद उबाठा गटात उमटण्यास सुरुवात झाली आहे. पक्षाने लोकसभेत घेतलेल्या भूमिकेला थेट आव्हान देत माजी खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी बंडाचे निशाण फडकवले असून, त्या लवकरच पक्षाला 'जय महाराष्ट्र' करण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.महिला आरक्षणाशी संबंधित १३१ व्या घटनादुरुस्ती विधेयकावर संसदेत मतदान झाले. या विधेयकाला २९८ मते मिळाली, तर २३० सदस्यांनी विरोधात कौल दिला. आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याने हे विधेयक नामंजूर झाले. उबाठा गटाच्या खासदारांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केले होते. मात्र, प्रियांका चतुर्वेदी यांनी पक्षाची ही अधिकृत भूमिका झुगारून देत विधेयकाचे उघड समर्थन केले आहे.

### मूव्हिट्रॅप बजावणार निर्णायक भूमिका

**मुंबई :** महानगरपालिकेच्या अखत्यारितील सोसायटी फॉर मुंबई इनक्यूबेशन लॅब टू एंटरप्रेन्योरशिप (स्माईल) कॉन्सिलच्या माध्यमातून मुंबईतील विविध स्टार्टअप उद्योगांना बळ देण्याचे करण्यात येत असलेले कार्य अभिनंदनीय आहे, असे उद्गार महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) अविनाश ढाकणे यांनी काढले. ते आज 'मुव्हीट्रॅप' या डास निर्मूलनात महत्त्वाची भूमिका बजावू शकणाऱ्या उत्पादनाच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना बोलत होते.

### नगरसेवकांनाच दंड ?

**मुंबई : मुंबई महापालिका मुख्यालयात सध्या उपस्थित राहणाऱ्या नगरसेवकांच्या वाहनांना सध्या आरटीओची चलनच अधिक फाडले जात आहे. मुख्यालय इमारतीच्या शेजारी वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने आसपासच्या जागेत तसेच रस्त्याच्या कडेला नगरसेवक आपली वाहने उभी करतात. या वाहनांचे फोटा वाहतूक पोलिसांनी काढून त्यांच्या नावे दंडाचे चलन फाडण्याचा प्रयत्न केला आहे. बारा ते पंधरा नगरसेवकांच्या वाहनांच्या नावे दंडाची चलन फाडली गेल्याने नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.एवढेच नाही तर सहायक आयुक्तांच्या वाहनांवरही दंडाच्या चलन फाडल्या गेल्या आहेत. त्यामुळे जनतेला वाहनतळाची सुविधा देणाऱ्या महापालिकेला आपल्याच नगरसेवकांना वाहनतळाची सुविधा देता येत नसल्याने ही अधिकच वाढली आहे.**

# होर्मुझनंतर हवाई मार्गाबाबत मोठा निर्णय

## इराणमध्ये अडकलेल्यांना दिलासा, भारतीयांनाही फायदा

**वृत्तसंस्था**

**तेहरान :** होर्मुझच्या सामुद्रधुनीनंतर इराणने आता देशाच्या काही भागातून विमान उड्डाणांना परवानगी देण्याची घोषणा केली आहे. प्राधिकरणाने सांगितले की, इराणने आज शनिवारी रोजी त्यांच्या हद्दीच्या पूर्वेकडील भागातून जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमानांसाठी त्यांची हवाई हद्द अंशतः पुन्हा उघडली आहे. दरम्यान, २८ फेब्रुवारी रोजी इस्रायल आणि अमेरिकेनेइराणवर केलेल्या हल्ल्यानंतरसुरू झालेल्या युद्ध संघर्षामुळे इराणने त्यांची हवाई हद्द बंद केली होती. आता प्राधिकरणाच्या निवेदनात असे म्हटले आहे की, 'इराणच्या हवाई हद्दीच्या पूर्वेकडील भागातील हवाई मार्ग आंतरराष्ट्रीय विमानांसाठी खुले आहेत. अनेक विमानतळे पुन्हा उघडण्यात आली आहेत.'असे सांगितले जात आहे की, इराणने त्यांची हवाई हद्द पुन्हा उघडल्यानंतरच्या सुरुवातीच्या काही तासात इराणमधून एकही आंतरराष्ट्रीय विमान गेले नाही. इराणने हवाई हद्द खुली केली असली तरी, विमान कंपन्या हा मार्ग वापरताना खबरदारी घेत आहेत.फेब्रुवारीमध्ये सुरू झालेलेअमेरिका आणि इराणमधील भीषण युद्ध३९ दिवस चालले. त्यानंतर ८ एप्रिल रोजी २२ एप्रिल पर्यंतचा २२ दिवसांचा युद्धविराम जाहीर करण्यात आला. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणने तेल वाहतुकीचा सर्वात व्यस्त असणारा होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग बंद केला. त्यानंतर शुक्रवारी इराणकडून हा मार्ग खुला करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.फेब्रुवारीमध्ये सुरू झालेलेअमेरिका आणि इराणमधील




भीषण युद्ध३९ दिवस चालले. त्यानंतर ८ एप्रिल रोजी २२ एप्रिल पर्यंतचा २२ दिवसांचा युद्धविराम जाहीर करण्यात आला. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणने तेल वाहतुकीचा सर्वात व्यस्त असणारा होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग बंद केला. त्यानंतर शुक्रवारी इराणकडून हा मार्ग खुला करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.दरम्यान, इराण आणि अमेरिकेतली करारातील एक महत्त्वाचा मुद्दा लेबनॉनमधील करार हा होता, येथीलयुद्धविरामाची घोषणागुरूवारी डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्यानंतर, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील नाकेबंदी हटवणे आणि हवाई हद्द काही भागांत खुली करण्याबाबत चर्चा केली. यानंतर आता इराणकडून हवाई हद्द आतंरराष्ट्रीय विमानांसाठी खुला करण्यात आली आहे. इराणच्या या निर्णयामुळे या प्रदेशात पुन्हा शांतता प्रस्थापित होण्याची अपेक्षा आहे.

### भोंदू खरात प्रकरणात दोषी कितीही प्रभावशाली असला तरी सोडू नका!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोलिसांना निर्देश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** भोंदू अशोक खरात प्रकरणात दोषी असणारी व्यक्ती कितीही प्रभावशाली असली तरी तिला सोडता कामा नये. या प्रकरणात पीडित महिलांना पूर्ण संरक्षण देऊन भक्कम पुरावे गोळा करा, जेणेकरून न्यायालयात अपराधसिद्धी (कन्व्हिक्शन) होण्यास मदत होईल, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिले.राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी शनिवारी गृहविभागाची तातडीची आढावा बैठक घेतली. या बैठकीला पोलीस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, विशेष तपास पथकाचे (एसआयटी) प्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी अशोक खरात प्रकरणासह नाशिकमधील धर्मांतर, तसेच गोरेगाव ड्रग्ज आणि परतवाडा येथील प्रकरणांचा विस्तृत आढावा घेण्यात आला.अशोक खरात प्रकरणात पीडित महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. पीडित महिलांमध्ये विश्र्वासाचे वातावरण निर्माण करा. हे प्रकरण न्यायालयात टिकण्यासाठी केवळ कागदोपत्री तपास नको, तर ठोस तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुरावे गोळा करण्यावर भर द्या. आरोपींच्या नावापेक्षा गुन्ह्याच्या गांभीर्यावर लक्ष द्या. तपास अशा पद्धतीने करा की कोणीही दोषी सुटता कामा नये. तपासाचा अंतिम उद्देश गुन्हेगाराला शिक्षा मिळवून देणे हाच असावा, असे फडणवीस यांनी बैठकीत बजावले. नाशिकमधील आयटी कंपनीत समोर आलेल्या धर्मांतर प्रकरणाचीही मुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेतली. राज्यात धर्मांतराचे प्रकार अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. नाशिक पोलिसांनी हे प्रकरण उजेडात आणले हे अभिनंदनीय आहे, मात्र आता यातील सर्व 'पॅटर्न' आणि 'अँगल' तपासून कसून तपास करा, असे आदेश त्यांनी दिले.याचबरोबर गोरेगाव आणि परतवाडा येथील प्रकरणावर भाष्य करताना त्यांनी पोलिसांना आक्रमक पवित्रा घेण्यास सांगितले. ड्रग्ज हे तरुणाईच्या भविष्याला लागलेली वाळवी आहे. त्यामुळे ड्रग्जविरोधात व्यापक मोहीम राबवा. परतवाडा प्रकरणातील पीडितांचे समुपदेशन करून त्यांना तक्रार देण्यासाठी प्रोत्साहित करा आणि यात सामाजिक संस्थांचीही

## नागपुरात उष्णतेच्या लाटेचा इशारा

# चंद्रावर घर कसं बांधायचं? नासाचा 'मास्टर प्लॅन'

चंद्रावर केवळ ध्वज फडकवून परत येण्याचे दिवस आता संपले असून, तिथे राहण्याची तयारी नासाने सुरू केली आहे. नासाच्या ताज्या दस्तऐवजानुसार, भविष्यात मंगळावर जाण्यासाठी चंद्राचा वापर एक 'लाँचिंग पॅड' म्हणून केला जाणार असून, त्यासाठी 'मून बेस' उभारणे अनिवार्य झाले आहे. या प्रक्रियेत अनेक तांत्रिक आव्हाने आणि अज्ञात धोके असले, तरी नासाने तीन टप्प्यांत ही मोहीम पूर्ण करण्याचे धोरण आखले आहे.

अमेरिकेची अंतराळ संस्था छ-ड- एका अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर काम करत आहे. नासाने नुकताच 'मून बेस युझर्स गाईड' (चेप इरीश णीशीीं त्र्ीळवश) हा ९ पानांचा महत्त्वाचा दस्तऐवज प्रसिद्ध केला आहे. हा केवळ एक रिपोर्ट नसून, चंद्रावर कायमस्वरूपी मानवी उपस्थिती दर्शवणारा एक रोडमॅप आहे. नासाच्या या आराखड्यानुसार, चंद्रावर बेस उभारण्यासाठी एकूण ७३ वेळा लँडिंग करण्याचे नियोजन आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे २० अब्ज डॉलर्स (म्हणजे जवळपास १.६६ लाख कोटी रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. हे मिशन केवळ चंद्रावर थांबण्यापुरते मर्यादित नाही, तर मंगळावर जाण्यासाठीची ही एक पूर्वतयारी आहे.



मोहिमेचे तीन महत्त्वाचे टप्पे

झहरीश १ (२०२९ पर्यंत): यामध्ये चंद्रावर विश्र्वासार्ह प्रवेश मिळवण्यासाठी २५ लाँच आणि २१ लँडिंग्स करण्याचे लक्ष्य आहे. यात रोबोटिक मोहिमांचा समावेश असेल.

झहरीश २ (२०२९-२०३२): या टप्प्यात पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल, ज्यात २७ लाँच आणि २४ लँडिंग्स होतील. येथे मानवी मोहिमांची सुरुवात होईल.

झहरीश ३ (शाश्र्वत उपस्थिती): या टप्प्यात चंद्रावर कार्गो सिस्टिम आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर मानवाची कायमस्वरूपी उपस्थिती सुनिश्र्चित केली जाईल.

नासाने या दस्तऐवजात प्रांजळपणे कबूल केले आहे की, अनेक तंत्रज्ञान अजून अस्तित्वात नाहीत किंवा त्यांना मोठ्या सुधारणेची गरज आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर (SOUTH POLE) हा बेस उभारला जाणार आहे, जिथे सूर्यप्रकाश कमी असतो आणि तापमान उणे २४० अंशांपर्यंत खाली जाऊ शकते. या कडाक्याच्या थंडीत आणि अंधारात टिकून राहण्यासाठी नासा अणुऊर्जेचा वापर करण्याचा विचार करत आहे. तसेच चंद्राची तीक्ष्ण धूळ (ङीपरी र्ऊीीं) आणि कमी गुरुत्वाकर्षण ही मानवी आरोग्यासाठी मोठी आव्हाने असणार आहेत.

या मून बेसचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, मंगळावर जाण्यापूर्वी सर्व प्रणालींची चाचणी घेण्यासाठी चंद्राचा वापर केला जाईल. चंद्रावर राहण्याचा अनुभव शास्त्रज्ञांना दीर्घकाळ अंतराळ प्रवासाचे नियोजन करण्यासाठी महत्त्वपूर्ण डेटा प्रदान करेल.



## 'कॉर्पोरेट जिहाद'ची होणार चौकशी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) मध्ये घडलेली घटना अंत्यत गंभीर आहे. ही घटना 'कॉर्पोरेट जिहाद'मध्ये मोडते का? याची सरकार गांभीर्याने चौकशी करीत आहे. यंत्रणा या घटनेच्या मुळाशी जाण्यासाठी सखोल तपास करीत आहेत. जर एखाद्या कटाचा पुरावा समोर आला, तर सरकार निर्णायक कारवाई करण्यास तयार असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक टीसीएसमध्ये घडलेली घटना अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणाची दखल घेतल्याबद्दल मी 'टीसीएस'चे आभार मानतो. टीसीएसच्या प्रमुखांनी या घटनेचा निषेध केला असून, ते चौकशीत पोलिसांना सहकार्य करत आहेत. आम्हीही या घटनेच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहोत.धर्मांतर आणि छळाच्या आरोपांच्या पार्श्र्वभूमीवर 'टीसीएस'ने आपल्या नाशिक शाखेतील कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेसाठी खबरदारीचा उपाय म्हणून घरून काम करण्यास सांगितले आहे. तपासादरम्यान पोलिस अधिकाऱ्यांनी संशयित आरोपींमध्ये झालेले सुमारे ७८ संशयास्पद फोन कॉल रेकॉर्ड, ई-मेल आणि चॅट्स जप्त केले आहेत. पोलिसांना संभाव्य आर्थिक व्यवहारांचेही पुरावे मिळाले आहेत. एकूण नऊ गुन्हे दाखल केले असून, एक गुन्हा देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात आणि उर्वरित आठ गुन्हे मुंबई नाका येथे दाखल केले आहेत.







## संक्षिप्त वृत्त...

### महानगरपालिकेतील विविध समित्यांच्या सभापतीपदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर : २२ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांचे वितरण व स्वीकृती तर २४ एप्रिल रोजी होणार निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण समिती सभापती तसेच सहा विशेष समित्या आणि प्रभाग समित्यांच्या सभापतीपदासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जाहीर कार्यक्रमानुसार, सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्रांचे वितरण व स्वीकृती २२ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे. या दिवशी कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) नगर सचिव कार्यालय, मनपा सभागृह येथे नामनिर्देशन पत्रे उपलब्ध करून देण्यात येतील तसेच स्वीकारली जाणार आहेत.

नामनिर्देशन पत्रांची छाननी समितीच्या विशेष सभेत करण्यात येणार असून, सभागृहात पिठासीन अधिकारी यांच्याकडून छाननी प्रक्रिया पार पडेल. छाननीनंतर वैध उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येतील. त्यानंतर इच्छुक उमेदवारांना १५ मिनिटांच्या आत लेखी अर्जाद्वारे नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची संधी दिली जाणार आहे.

सभापती निवड प्रक्रिया २४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून क्रमाने सुरू होईल. आवश्यक असल्यास मतदान प्रक्रियेद्वारे निवड करण्यात येईल. यावेळी पिठासीन अधिकारी उमेदवारांची नावे वर्णानुक्रमाने जाहीर करतील आणि हात वर करून मतदान नोंदवले जाईल.

या निवडणुकीत प्रभाग समिती अ, ब, क चे सभापती तसेच गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाजकल्याण, महिला व बालकल्याण, स्थापत्य, वैद्यकीय व सहाय्य आरोग्य, विधी व महसूल वाढ, शहर सुधार आणि माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक समित्यांच्या सभापतींची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर आणि नगरसचिव विकास रत्नपारखे यांनी दिली.

### सेलूतील चाकूहल्ल्यातील एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू; अन्य एकाची प्रकृती चिंताजनक : जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील गायत्री नगर येथे किरकोळ वादातून झालेल्या चाकू हल्ल्यातील दोघा जखमींपैकी एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना गुरुवारी मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, आनंद दगडू ढोले (वय ३०) व आदित्य मिलिंद प्रधान (वय २२) या दोघांवर अज्ञात व्यक्तींनी चाकूने वार केले. यामध्ये आनंद ढोले यांच्या छातीत, तर आदित्य प्रधान यांच्या कमरेवर गंभीर वार करण्यात आले. जखमी दोघांना तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. आदित्य प्रधान यांच्या किडनीला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठविण्यात आले होते. उपचारादरम्यान शुक्रवारी दुपारी सुमारे २.३० वाजता त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, आनंद ढोले यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर आदित्य प्रधान यांच्या नातेवाईकांनी संबंधितांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्यापपर्यंत या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आलेला नसून, आरोपी मोकाट फिरत असल्याची माहिती समोर येत आहे.

### काकीनाडा टाउन-हिसार विशेष गाडीची घोषणा; नांदेड-पूर्णा-बसमत-हिंगोली-वाशीम-अकोला मार्गे धावणार

**परभणी,/तिनिधी :** उन्हाळी हंगामात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेकडून काकीनाडा टाउन ते हिसार दरम्यान ट्रेन ऑन डिमांड विशेष गाडी चालवण्याची घोषणा करण्यात आली असून ही गाडी मुदखेड-नांदेड-पूर्णा-बसमत-हिंगोली-वाशीम-अकोला मार्गे धावणार आहे. या गाडीमुळे प्रवाशांना अतिरिक्त प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे.

गाडी क्रमांक ०७७१७ काकीनाडा टाउन-हिसार टीओडी विशेष गाडी मंगळवार २१ एप्रिल रोजी सकाळी ५.४० वाजता काकीनाडा टाउन स्थानकावरून सुटेल. ही गाडी मुदखेड (२२.१५), नांदेड (२३.१०), पूर्णा (००.४०), बसमत (०१.१०), हिंगोली (०२.३५), वाशीम (०३.५५), अकोला (०५.४५) तसेच भुसावळ, वडोदरा, रतलाम आणि चित्तौडगड मार्गे गुरुवार २३ एप्रिल रोजी दुपारी १.४० वाजता हिसार येथे पोहोचेल. तर परतीच्या प्रवासात, गाडी क्रमांक ०७७१८ हिसार-काकीनाडा टाउन टीओडी विशेष गाडी शुक्रवार २४ एप्रिल रोजी दुपारी २.१० वाजता हिसार येथून सुटून रविवारी दुपारी १२.३५ वाजता काकीनाडा टाउन येथे पोहोचणार आहे.

या विशेष गाडीमध्ये एकूण २४ डबे असणार असून एसी फर्स्ट क्लास, एसी २-टियर, एसी ३-टियर, स्लीपर क्लास, जनरल सेकंड क्लास तसेच एसएलआर डब्यांचा समावेश असेल. त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रवाशांसाठी सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सुमारे ३५०० किलोमीटर अंतर आणि अंदाजे ९६ तासांचा प्रवास असलेल्या या गाडीमुळे नियमित गाड्यांवरील गर्दी कमी होण्यास मदत होणार असून प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

### पूर्णा येथे लोको फेल्युअर समस्यांवर सुरक्षा परिसंवाद : ४९ कर्मचाऱ्यांचा सहभाग : तात्काळ दुरुस्ती उपाययोजनांवर मार्गदर्शन

**पूर्णा/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत पूर्णा येथे अलीकडील व मागील लोको फेल्युअर समस्यांवरील 'ट्रबलशूटिंग तंत्र' या विषयावर सुरक्षा परिसंवाद आयोजित करण्यात आला. रनिंग स्टाफचे तांत्रिक ज्ञान वृद्धिंगत करणे व ऑपरेशनल अडचणींना प्रभावीपणे सामोरे जाण्याची क्षमता विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

परिसंवादादरम्यान लोकोमोटिव्ह संचालनाशी संबंधित विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः कमी बॅटरी व्होल्टेज, एमआर प्रेशर घटणे तसेच बीपी प्रेशर निर्माण व टिकवून ठेवण्याच्या पद्धती याबाबत सखोल माहिती देण्यात आली. पुनरावृत्ती होणाऱ्या बिघाडांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि संचालन अधिक विश्वासार्ह करण्यासाठी तात्काळ दुरुस्ती उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला.

हा परिसंवाद विभागीय विद्युत अभियंता एस. एस. आर. फणी कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना संबोधित करत लोको फेल्युअर प्रभावीपणे हाताळण्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले. या परिसंवादात एकूण ४९ कर्मचारी सहभागी झाले होते. यामध्ये मुख्य लोको निरीक्षक, लोको पायलट व सहाय्यक लोको पायलट यांचा समावेश होता. सत्रादरम्यान जागरूकता वाढवणे, ट्रबलशूटिंग कौशल्ये

# बस-कार अपघातात दोनजण जखमी, ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दि १८ जिंतूर-औंढा नॅशनल हवे- ७५२ रोडवरील पुंगळा शिवारात आज दुपारी २.१० वाजता भीषण बस आणि कार यांच्यात अपघात झाला. दोन जण गंभीर जखमी झाले असून सदरील जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी नागरिक व पोलिसांच्या मदतीने दाखल करण्यात आले आहे.

अपघातात विजय राठोड वय २० वर्षे व प्रवीण पवार व ३० वर्षे रा. धानोरा ता. सिंदखेड राजा जि बुलढाणा येथील आहेत.

सदरील बस जिंतूर हून गंगापूर- माहूर कडे जात होती .तर नांदेडहून सदरील कार जिंतूर कडे येत होती.

अपघातातील वाहन आज्ञा आयसर, ईरटीका गाडी क्रमांकगाडी क्र. ४८ ६५४० व रा.प .म. बस क्रमांक२० ४०१५ यातील अज्ञात आईसर हे बसचे पुढे माहूर कडे जात असतात नांदेडहून कडूनयेणारी ईरटीका गाडी हे आईसर ला धडक देऊन आईसर च्या पाठीमागे जात असलेली बस बसचे साईडला येऊन समोरासमोर



धडक दिली .त्यात वरील ईरटीका मधील नमूद जखमी गंभीर जखमी झाली आहेत आय सर ,ईरटीका भरधाव वेगातअसल्याने एकमेकाला धडक देऊन आईसरचे पाठीमागे जात असलेल्या बसला जोराची धडक देऊन गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना दवाखान्यात पाठवले वाहतूक सुरळीत भेट देणारे अमलदार :- पो उप निरीक्षक प्रकाश नेव्हल. मेटके जिंतूर रुग्णवाहिका व नागेश आकात यांनी मदत केली.

### छेडछाडीला कंटाळून १५ वर्षीय शाळकरी मुलीची आत्महत्या आरोपीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यातील देऊळगावगात परिसरात एका १५ वर्षीय शाळकरी मुलीने सातत्याने होत असलेल्या छेडछाडीला कंटाळून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही दुर्दैवी घटना शुक्रवार (दि. १७ एप्रिल २०२६) रोजी पहाटे १.३० ते १.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. संबंधित मुलगी ही सेलू येथील रहिवासी असून, ती शाळेत ये-जा करत असताना गेल्या तीन महिन्यांपासून आरोपी कैलास विजय लोंडे (रा. अर्जुन नगर, सेलू) तसेच एका अनोळखी व्यक्तीकडून सतत त्रास दिला जात होता.

मुलीला रस्त्यात अडवणे, छेडछाड करणे, अश्लील शिवीगाळ करणे आणि जिवे मारण्याच्या धमक्या देणे असे प्रकार वारंवार घडत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या मानसिक छळामुळे व भीतीच्या छायेखाली जगत असताना संबंधित मुलीने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले.

गुन्हा दाखल; तपास सुरू....

या प्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०८, ३५२, ३५१(२)(३), ३(५), ७८ तसेच पोक्सो कायदा कलम १२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी वाघमारे, पोलिस निरीक्षक बोरसे आणि तपास अधिकारी श्रीमती पुंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

नागरिकांत संताप; कठोर कारवाईची मागणी....

अल्पवयीन मुलींवरील वाढत्या छेडछाडीच्या घटनांमुळे पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

समाजासाठी इशारा....

ही घटना केवळ एक आत्महत्या नसून समाजातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

### आडगाव येथे महसूल समाधान शिबीर उत्साहात : नागरिकांना विविध सेवा तत्काळ उपलब्ध; ५०० नागरिकांना सातबारा व आठ-अ उतारे वितरित

**परभणी,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील आडगाव महसूल मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज उत्सवाच्या निमित्ताने शुक्रवारी (दि. १७) आडगांव जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात महसूल समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूरच्या तहसीलदार शितल कछवे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार दिलीपराव गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य डॉ. देवराव कराळे, पंचायत समितीच्या उपसभापती सोनाली माधवराव दराडे, सदस्य अशविनी बाळू दाभाडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुंदरराव नाईक चव्हाण, आडगावचे सरपंच प्रदीप दाभाडे, देवसडीचे सरपंच शिवाजीराव काळे यांची उपस्थिती होती. याशिवाय आडगाव मंडळातील विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या. जातीचे, उत्पन्नाचे, रहिवासी व नामनिर्देशन प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक दाखले देण्यात आले.

## हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांचा जिंतूरात उत्स्फूर्त सत्कार

### के.जी.एन. ग्रुपचा पुढाकार; जामा मस्जिद परिसरात धार्मिक वातावरणात सोहळा

**जिंतूर,/प्रतिनिधी :** इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या मक्का-मदिनाच्या हज यात्रेसाठी यंदा जिंतूर शहरातील सुमारे ३५ ते ४० मुस्लिम बांधव व महिला रवाना होत असून, त्यांच्या शुभप्रवासानिमित्त के.जी.एन. ग्रुपच्या वतीने जामा मस्जिद परिसरात भाविकांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामुळे परिसरात धार्मिक आणि भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

हज यात्रा निर्विघ्न व धार्मिक पद्धतीने पार पाडता यावी, यासाठी मागील दोन महिन्यांपासून दर दहा दिवसांनी विशेष प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये मौलाना तज्मुल अहमद, मुफ्ती मुसद्दीक यांच्यासह अन्य मान्यवर मौलवींनी हज यात्रेचे धार्मिक महत्त्व, विविध विधी, आवश्यक नियम व शिस्त याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. भाविकांनीही या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त



प्रतिसाद देत हज विधींचे बारकावे आत्मसात केले. दि. १६ एप्रिल रोजी अंतिम प्रशिक्षण शिबिरानंतर के.जी.एन. ग्रुपच्या युवकांनी भाविकांचा सन्मानपूर्वक सत्कार केला.

यावेळी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी भाविकांना शुभेच्छा देत त्यांच्या सुरक्षित, यशस्वी व मंगलमय हज यात्रेसाठी विशेष प्रार्थना केली.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी हाजी अब्दुल सत्तार, महेमुद इलेक्ट्रिशियन, मो. साजिद पिराणी, पठाण रईसखान, अमजद, शेख लुखमान, खलीक खान, राहिल खान, जम्मू जामदार, निसार खान, आसिफ खान (कारपेंटर), शेख रशीद राज,जावेद खान (कारपेंटर), जाहेद बेग मिर्झा, शेख अरसलान, सोफीयान कौसडीकर, शेख अहमद, साऊथ चाऊस, शेख अलीम आदींनी परिश्रम घेतले.

हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान व उत्साहाचे भाव दिसून येत असून, शहरभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## परभणी तालुक्यातील खरीप २०२५ पिक विमा तातडीने मंजूर करा :

**परभणी,/प्रतिनिधी-** : परभणी जिल्ह्यातील खरीप हंगाम २०२५ मधील सोयाबीन व कापूस पिकांना विमा मंजूर करून तत्काळ वितरण करावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

परभणी तालुक्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये सोयाबीन व कापूस पिकांसाठी विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना अद्याप विमा रक्कम मिळालेली नसल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमानुसार वेळेत विमा हप्ता भरूनही शेतकरी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहिल्याने आर्थिक अडचणी अधिकच तीव्र झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुकाध्यक्ष प्रभाकर कदम यांच्या नेतृत्वात सुभाष गरुड, लक्ष्मण आरमळ, लक्ष्मण कराळे, प्रताप कदम, शिवम देशमुख, शुभम देशमुख, श्याम देशमुख, सुधाकर देशमुख, विठ्ठल गरुड, अर्जून देशमुख, श्रीकांत देशमुख, प्रताप देशमुख, विनायक देशमुख, शहाबुद्दीन वजीर शेख, ज्ञानेश्वर रसाळ आदींच्या शिष्टमंडळाने शनिवार १८ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, संबंधित पिक विमा योजनेअंतर्गत () या कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, परभणी तालुक्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही विमा मंजुरीबाबत अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये विमा रक्कम मंजूर करण्यात आली असल्याची माहिती समोर येत असताना, परभणी तालुक्यातील शेतकरी मात्र या लाभापासून वंचित आहेत, अशी खंत या निवेदनाद्वारे व्यक्त केली.

पिक विमा योजनेचा उद्देश नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा असला, तरी प्रत्यक्षात होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत होत

### सेलूत मोकाट कुत्र्याचा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर हल्ला

**सेलू/प्रतिनिधी -** सेलू शहरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या सेवानिवृत्त कर्मचारी शमशोदिन शेख यांच्यावर मोकाट कुत्र्याने हल्ला करून त्यांच्या डाव्या हाताला गंभीर जखम केली. ही घटना शुक्रवार १७ एप्रिल रोजी सकाळी भोई गल्ली परिसरात घडली.

शेख हे नेहमीप्रमाणे सकाळी फिरून घरी परतत असताना कुत्र्याने त्यांच्या डाव्या हाताला कडाडून चावा घेतला. कुत्र्याने अक्षरशः त्यांच्या हाताला पूर्ण तोंडात घेण्याचा प्रयत्न केला, मात्र सुदैवाने मोठा अपघात टळला. तरीही त्यांच्या हाताला खोल जखम झाली असून त्यांना तत्काळ सेलू उपजिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शहरातील भोई गल्ली, सुरज मोहल्ला (म्हसोबा चौक), जवेरी गल्ली आदी भागांमध्येही मोकाट कुत्र्यांकडून लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना चावा घेण्याच्या घटना घडल्या आहेत. विशेषतः पाथरी, परभणी आणि जिंतूर येथे मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यांमध्ये बालकांच्या मृत्यूच्या घटना ताज्या असतानाच, सेलू शहरातही अशीच धक्कादायक घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### नागरिकांना दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध करून द्या : महापौर सय्यद एकबाल

**परभणी,/प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना महापौर सय्यद इकबाल यांनी दिल्या.

शहरातील दर्गा रोड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला महापौर सय्यद इकबाल यांनी शुक्रवार १७ एप्रिल दुपारी अचानक भेट देत आरोग्य सेवांचा आढावा घेतला. या पाहणीवेळी नगरसेवक मुशु खान, नगरसेवक नईमभाई, नगरसेवक अब्रार इलाही, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, डॉ. सना खान तसेच आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

महापौरांनी केंद्रातील औषधसाठा, त्याचा वापर तसेच उपलब्ध सुविधांची सविस्तर तपासणी केली. तसेच सर्व कर्मचाऱ्यांची ओळख करून घेत त्यांच्या कामकाजाचा आढावाही घेतला. यावेळी महापौर सय्यद इकबाल यांनी नागरिकांना दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. आरोग्य केंद्रास आवश्यक असणारे साहित्य तात्काळ मागवावे, ते भांडार विभागामार्फत उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच प्रलंबित समस्या तातडीने सोडवण्याचे आदेश देत गोरगरिब नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात प्रतिसाद

**जिंतूर ,/प्रतिनिधी:** छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात प्रतिसाद जिंतूर जिंतूर तालुक्यातील आडगाव महसूल मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराज उत्सव समाधान शिबीर चे आयोजन शुक्रवारी दिनांक १७ रोजी जिल्हा परिषद शाळा आडगाव प्रगणातकरण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिंतूरच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार शितल कछवे व प्रमुख पाहुणे म्हणून दिलीपराव गायकवाड नाईक तहसीलदार जिंतूर व जिल्हा परिषद सदस्य डॉक्टर देवराव कराळे पंचायत समितीचे उपसभापती सोनाली माधवराव दराडे पंचायत समिती सदस्य अश्विनी बाळू दाभाडे कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती सुंदरराव नाईक चव्हाण आडगाव चे सरपंच प्रदीप राव दाभाडे देवसोडीचे सरपंच शिवाजीराव काळे व आडगाव मंडळ मधील सर्व गावचे सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमास माधवराव दराडे प्रदीप राव दाभाडे प्रकाशराव दाभाडे रामजी शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते या शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या यामध्ये जातीचे उत्पन्नाचे नामकर्णीय रहिवासी आदीप्रमाणपत्रे व विविध दाखले या ठिकाणी सातबारा व आठ चे उतारे पाचशे जणांना देण्यात आले फेरफार प्रकरणी नोंदणीतील चुका दुरुस्त जमिनी अभिलेख अद्यावत करणे तसेच अकर्षित यांनी संदर्भात मार्गदर्शन यांचा समावेश व तसेच जमीन विषयक प्रलंबित प्रकरणाचा निपटाळा करण्यात आला यासोबतच नागरिकांना विविध शासकीय योजनेची माहिती देत सामाजिक योजनेचा लाभ ही मोजणी अर्ज प्रक्रिया तसेच पीएम किसान नोंदणी बाबत मार्गदर्शन करण्यात आले या शिबिरात आरोग्य कृषी मुद्रांकडून पुरवठा आधी विभागाच्या स्वांत माहिती कक्ष उभारून नागरिकांना सविस्तर माहिती दिली तहसीलदार शितल कछवे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवा लाभ घेतला एकूण हा उपक्रम अत्यंत यशस्वीरित्या पार पडला या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी या कार्यक्रमात घरकुल योजनेच्या विषय घरकुल योजनेचे इंजिनियर अनिल दाभाडे आडगाव मंडळाचे मंडळ अधिकारी श्रीमती राधा कदम मॅडम गाव महसूल अधिकारी आर् एन गायकवाड श्री प्रवीण माटे रुपेश वावळे अनिल राठोड प्रणाली वड निकिता पाटील पांडव वीर मॅडम व सर्व विभागाचे कर्मचारी या ठिकाणी सर्व विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन तहसील अवल कारकून श्री होळंबे यांनी केले

संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# देश 'त्यांना' माफ करणार नाही...

शेवटी ज्याची भीती होती, तेच झाले. देशातील ५० टक्के लोकसंख्येला म्हणजे मातृशक्तीला लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के आरक्षण देणारे १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळले गेले. एका ऐतिहासिक परिवर्तनापासून देश वंचित राहिला. सुवर्णाक्षरांनी ज्या घटनेची इतिहासात नोंद झाली असती, ती घटना आता काळ्या अक्षरात नोंदवावी लागणार आहे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी या देशातील मातृशक्तीचा पुन्हा एकदा विश्वासघात केला, त्यांच्या स्वप्नांवर आपल्या क्षुद्र राजकीय महत्त्वाकांक्षेपायी नुसते पाणीच नव्हे तर काळे पाणी फेरले. देशातील नारीशक्तीला वंदन करण्यासाठी सरकारने या विधेयकाचे नाव 'नारीशक्ती वंदन विधेयक' असे ठेवले होते. पण काँग्रेसने महिलांना वंदन करणे तर दूर; थेट त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला, असे अतिशय खेदाने म्हणावे लागते. तीन दशकांपूर्वी हे विधेयक फेटाळण्यात आले होते. आज त्याच इतिहासाची पुनरावृत्ती झाली. याची किंमत देशातील विरोधी पक्षांना चुकवावी लागणार आहे. हा देश त्यांना कधीच माफ करणार नाही. कारण या देशात महिलांचा अपमान झाला तर महाभारत घडते, असा इतिहास आहे. त्यामुळे पुन्हा एकदा देशात महाभारत घडणार आहे, महिलांच्या रोषाचा उद्रेक होणार आहे. महिलांना देशाचे भविष्य घडविण्याच्या प्रक्रियेत पूर्ण ताकदीने सहभागी होण्याचा न्याय्य हक्क नाकारण्यात आला. खरं म्हणजे काँग्रेसच्या काळात एक महिला म्हणजे इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान होत्या. महिला असूनही देशातील महिलांना लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के आरक्षण देण्याची कल्पना त्यांना सुचली नाही; सुचली असेल तरी त्यांनी ती अंमलात आणली नाही.

संपुआ सरकारच्या १० वर्षांच्या काळात सोनिया गांधी पंतप्रधान नसल्या, तरी पंतप्रधानांपेक्षा कमीही नव्हत्या. 'सुपर पीएम' म्हणून त्या ओळखल्या जात होत्या, पण त्यांनीही महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या दृष्टीने काहीच केले नाही. आपल्या पंतप्रधानांनी म्हणजे नरेंद्र मोदी यांनी लोकसभा आणि राज्य विधानसभांत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबाबतचे ऐतिहासिक असे विधेयक पारित करून घेतले. आता काँग्रेसने यासंदर्भातील तीन घटनादुरुस्ती विधेयकांना विरोध करीत आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. विद्यमान लोकसभेच्या सदस्य संख्येतच महिलांना ३३ टक्के आरक्षण का दिले नाही, अशी विचारणा काँग्रेसच्या प्रियांका वढेरा करीत आहेत. पण केंद्रात २०१४ च्या आधी काँग्रेसचे सरकार असताना प्रियांका वढेरा यांनी असा प्रयत्न का केला नाही; तेव्हा आवाज का उठवला नाही, असे विचारायला हवे. आज देशातील महिलांचा आपल्याला कळवळा आल्याचे नाटक त्या करीत असल्या, तरी या देशातील महिलांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न देशात पहिल्यांदा भाजपाने आणि मोदी सरकारने केला, हे कोणाला नाकारता येणार नाही. त्यामुळे तेव्हा कुठे गेला होता, 'राधासुता तुझा धर्म'च्या चालीवर तेव्हा कुठे गेला होता, 'सोनियाकन्ये तुझा धर्म' असे त्यांना विचारायला पाहिजे. या देशातील महिलांना आरक्षण मिळू नये, अशी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची भूमिका सुरुवातीपासूनच दिसत होती. त्यामुळेच ते या घटनादुरुस्ती विधेयकाला कारण नसताना फाटे फोडत होते. ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी लोकसभेची सदस्यसंख्या वाढविण्यासाठी आणि त्यातील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यासाठी १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले होते. ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्यासाठी आधी जनगणना आणि नंतर मतदारसंघांची फेररचना म्हणजे परिसीमन आवश्यक आहे. २०११ नंतर देशात जनगणना झाली नाही. २०२१ मध्ये जनगणना होणार होती, पण कोरोनाच्या कारणामुळे ती होऊ शकली नाही. जनगणना न झाल्यामुळे मतदारसंघाचे परिसीमन होऊ शकत नाही. त्यामुळे ३३ टक्के महिला आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करता आली नसती. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून याची अंमलबजावणी करण्याची सरकारची भूमिका असल्यामुळे या मार्गातील कायदेशीर अडथळे दूर करण्यासाठी सरकारने तीन घटनादुरुस्ती विधेयके आणली. पण काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करीत सरकारला अपशकून करण्याचा प्रयत्न केला, असे म्हणावे लागते.

विरोधी पक्ष उपस्थित करीत असलेल्या सर्व आक्षेपांचे सरकारने स्पष्ट शब्दात निराकरण केले होते. विरोधी पक्षाने जाणीवपूर्वक या मुद्यावरून देशातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. वेड घेऊन पेडगावला जाणे अशी एक म्हण आहे. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे आचरण त्यासारखेच आहे. लोकसभेत या विषयावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेले भाषण पूर्णतः बेजबाबदारपणाचे होते, असे म्हणावे लागेल. 'ऑपरेशन सिंदूर'बाबत राहुल गांधी यांनी केलेले विधानही अतिशय आक्षेपार्ह होते. महिला आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण परिसीमनाला विरोध असल्याची विरोधी पक्षांची भूमिका दुटप्पीपणाची होती. परिसीमनात लोकसंख्येच्या आधारावर उत्तर भारतातील लोकसभेच्या जागा वाढतील आणि दक्षिण भारतातील जागा कमी होतील, अशी भीती विरोधी पक्षांना भेडसावत आहे. त्याचे सरकारी पातळीवर निराकरण करण्यात आले होते. लोकसभेच्या जागा सरसकट ५० टक्क्यांनी वाढविण्याचा प्रस्ताव सरकारने या घटनादुरुस्ती विधेयकातून ठेवला होता, पण त्यानेही विरोधी पक्षांचे समाधान झाले नाही. मुळात मतदारसंघाच्या परिसीमनाबाबत विरोधी पक्षांनी उपस्थित केलेले आक्षेप अनाठायी आणि निराधार आहेत. ८१५ हा आकडा कुठून आणला, अशी निर्बुद्धपणाची विचारणा ते करीत होते. परिसीमनाच्या मुद्यावर कोणत्याही राज्यांशी भेदभाव होऊ देणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. गृहमंत्री अमित शाह यांनी तर दक्षिण भारतातील राज्यांच्या जागा कशा वाढणार आहेत, हे आकडेवारीनुसार सांगितले होते. दक्षिण भारतातील पाच राज्यांत लोकसभेच्या १२९ जागा आहेत; यात सरसकट ५० टक्क्यांनी वाढ होत त्या १९५ पर्यंत जाणार होत्या. महिला आरक्षणाचा राजकीय लाभ भाजपाला मिळेल, ही विरोधी पक्षांची खरी भीती होती. या मुद्यावरही मोदी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. महिला आरक्षणाच्या मुद्यावर मला राजकीय फायदा नको आहे, पाहिजे तर तुम्ही सर्व श्रेय घ्या; पण विधेयक पारित करायला सहकार्य करा, अशी कळकळीची विनंती मोदी यांनी केली होती. सरकारी खर्चाने देशातील सर्व वृत्तपत्रांत जाहिरात देतो आणि त्यांत मी तुमचे फोटो छापतो, असे म्हणत मोदी यांनी ब्लँक चेक विरोधी पक्षांना दिला होता. पण देशातील जनतेच्या विश्वासाच्या बँकेत दिवाळखोर ठरलेल्या विरोधी पक्षांची हा चेक वटवण्याची क्षमता नव्हती. खरं म्हणजे महिला आरक्षण विधेयक पारित होऊ नये, अशी देशातील समस्त विरोधी पक्षांची भूमिका होती, त्यामुळे ते यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयकाला कारण नसताना विरोध करीत होते. विरोधी पक्षांमुळे आपला न्याय्य हक्क आणि अधिकार दुसऱ्यांदा नाकारण्यात आला, हे देशातील महिलांना समजले आहे. त्यामुळे आता त्या रणरागिणी झाल्याशिवाय राहणार नाहीत. २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिले आणि देशालाही दाखविले आहे. या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी महिलांना लोकसभा तसेच विधानसभांत ३३ टक्के वाटा मिळायला हवा होता. असे करत आम्ही या देशातील महिलांवर उपकार करत नाही, तर त्यांना त्याचा हक्क आणि अधिकार देत आहोत, ज्यापासून आतापर्यंत त्यांना जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले.

विरोधी पक्षांच्या असहकारामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत ३३ टक्के महिला आरक्षण लागू होणार नाही, यासाठी आता त्यांना २०३४ ची वाट पाहावी लागेल, असे दिसते. हे त्यांच्यासाठी अन्यायकारक होईल. विरोधी पक्षांनी किमान या मुद्यावर तरी राजकारण करायला नको होते. या विधेयकामुळे देशाचा चेहरामोहरा बदलणार होता; नव्या आणि विकसित भारताचा मार्ग प्रशस्त होणार होता, पण विरोधी पक्षांनी घोडचूक करून ठेवली. याची किंमत त्यांना येणाऱ्या काळात चुकवावी लागेल आणि इतिहास त्यांना कधीच माफ करणार नाही.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# शरद पवार जिंकल्याचा अभिनय का करताहेत?

राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी स्वतःला काळाच्या ओघातही अपराजित मानतात. त्यांच्याभोवती एक वलय निर्माण होते, ज्यात ते स्वतः आणि त्यांचे समर्थकही रमून जातात. महाराष्ट्राच्या राजकारणातील असेच एक नाव म्हणजे शरद पवार. त्यांच्या राजकीय कारकीर्दीकडे पाहताना, मला हॉलिवूडच्या 'कार्स ३' या चित्रपटातील लायटनिंग मॅकविन या नायकाची आठवण येते. मॅकविन हा एकेकाळी रेसिंग जगताचा सम्राट होता; पण बदलत्या काळानुसार आणि नव्या तंत्रज्ञानासमोर तो कसा हतबल झाला, हे चित्रपटात प्रभावीपणे दाखवले आहे. शरद पवारांच्या सद्यस्थितीशी या कथेची तुलना केल्यास, मॅकविनने घेतलेला योग्य निर्णय पवारांना का घेता आला नाही, हे स्पष्ट होते आणि त्यांची आजची राजकीय अवस्था ही त्यांच्याच चुकीच्या निर्णयांचे फलित आहे, हे अधोरेखित होते.

'कार्स ३' मध्ये लायटनिंग मॅकविन हा रेसिंगचा अनभिषिक्त सम्राट असतो. त्याने अनेक विजेतेपदे पटकाविलेली असतात. त्याचे चाहते त्याला अजूनही तरुण आणि अजिंक्य मानतात. त्याच्याभोवतीचे लोक त्याला याच भ्रमात ठेवतात. पण, रेसिंगच्या जगात जॅक्सन स्टॉर्मसारख्या नव्या पिढीच्या, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज कारचा उदय होतो. स्टॉर्म मॅकविनला सहज हरवतो. मॅकविनला हे सत्य पचवणे कठीण जाते. त्याला जाणवते की, त्याचे जुने तंत्रज्ञान आणि अनुभव आता कालबाह्य झाले आहेत. तो नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करतो, जिथे त्याला क्रूझ रामिरेझ भेटते. क्रूझ त्याला प्रशिक्षण देते. मॅकविनला हेही कळते की, क्रूझला स्वतःला रेसर बनायचे होते, पण तिचे स्वप्न अपुरे राहिले. अखेरच्या शर्यतीत मॅकविनला आपली चूक उमगते. तो क्रूझला आपली जागा देतो आणि क्रूझ ती शर्यत जिंकते. मॅकविन निवृत्त होतो, पण त्याचा वारसा क्रूझच्या रूपाने पुढे नेला जातो आणि मॅकविनची मानही उंचावली जाते. मॅकविनने योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन आपला वारसा पुढे नेला आणि सन्मानाने निवृत्ती स्वीकारली.

शरद पवारांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले असता, मॅकविनच्या सुरुवातीच्या यशाची आणि अनुभवाची आठवण येते. अनेक दशके त्यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात आपले वर्चस्व राखले. मॅकविनप्रमाणेच आता शरद पवारही एका अशा टप्प्यावर आले आहेत, जिथे त्यांना नव्या पिढीच्या आणि बदललेल्या राजकारणाच्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. नुकतीच त्यांनी राज्यसभेची शपथ घेतली, हे पाहता त्यांच्या मनात अजूनही राजकारणात सक्रिय राहण्याची तीव्र इच्छा असल्याचे दिसते.



या वयात आणि शारीरिक मर्यादा असताना ते किती प्रभावीपणे काम करू शकतील, हा प्रश्न केवळ विरोधकांनाच नाही तर त्यांच्या कार्यकर्त्यांनाही पडला आहे. ही त्यांची राजकीय हतबलता स्पष्टपणे दिसते. मॅकविनने जॅक्सन स्टॉर्मच्या रूपाने आलेल्या नव्या तंत्रज्ञानाला आणि नव्या पिढीला स्वीकारले, पण शरद पवारांच्या बाबतीत मात्र हे चित्र पूर्णपणे भिन्न आहे. त्यांच्या पक्षातील फुटीनंतर, अजित पवार गट आणि शरद पवार गट असे दोन गट निर्माण झाले. या फुटीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे खिळखिळा झाला. या घटनेने हे स्पष्ट झाले की, शरद पवारांना एक सक्षम आणि एकसंध वारसदार निर्माण करण्यात पूर्णपणे अपयश आले आहे. आजही त्यांना स्वतःच पक्षाची धुरा सांभाळावी लागत आहे. त्यांचे वय आणि प्रकृती पाहिली तर हे एक मोठे आव्हान आहे. 'आपल्याच हाती पक्षाची धुरा असायला हवी' या अट्टाहासापोटी त्यांनी स्वतःचा पक्षच कमकुवत केला, अशी टीका त्यांच्यावर सातत्याने केली जाते. मॅकविनने क्रूझला संधी देऊन आपला वारसा पुढे नेला; पवारांना मात्र तसा निर्णय घेता आलेला नाही. त्यांनी आपल्याच कुटुंबातील सदस्यांना वारसदार म्हणून पुढे आणण्याचा प्रयत्न केला; त्यातही त्यांना यश आले नाही. उलट, पक्षाचीच वाताहत होत गेली.

या संपूर्ण परिस्थितीत देवेंद्र फडणवीस यांचा उदय आणि त्यांनी खेळलेले राजकीय डावपेच हे जॅक्सन स्टॉर्मच्या आगमनासारखेच आहेत. फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपले स्थान भक्कम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने राज्यात मोठी ताकद मिळविली आहे. अजित पवारांना सोबत घेऊन त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडली आणि शरद पवारांना एकाकी पाडले. एक प्रकारे त्यांनी तेल लावलेला पैलवान शरद पवार यांना चेकमेटच केले. शरद पवारांना राज्यसभेची जागा देऊ करणे, हा फडणवीस यांच्या राजकीय चातुर्याचाच एक भाग होता, असे अनेक राजकीय विश्लेषक मानतात. यातून त्यांनी पवारांना एका विशिष्ट मर्यादेत ठेवण्याचा आणि त्यांचे राजकीय महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांना राष्ट्रपती नामनिर्देशित खासदारकी मिळाल्यावर, 'पूर्वी छत्रपती पेशव्यांची नेमणूक करायचे आणि पेशवे फडणवीसांची नेमणूक करायचे. आता फडणवीस छत्रपतींची नेमणूक करतात.' अशी खोचक टीका पवारांनी केली होती. पवारांनी फडणवीसांची जात काढली होती. मात्र आता त्याच फडणवीसांच्या कृपेने शरद पवार यांना खासदारकी मिळालीय, हे दुर्दैव म्हणावे की नियती?

वाचक हो, मॅकविनला जॅक्सन स्टॉर्मने हरवल्यानंतर त्याला नव्या तंत्रज्ञानाची गरज जाणवली; त्याचप्रमाणे पवारांनाही बदललेल्या राजकीय समीकरणांची आणि नव्या पिढीच्या राजकारणाची दखल घेणे आवश्यक होते. पण, त्यांनी जुन्याच शैलीत राजकारण सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे त्यांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागला आणि अखेरीस त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. राजकारणात योग्य वेळी निवृत्त होणे आणि सक्षम वारसदार निर्माण करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. मॅकविनने हे ओळखले आणि क्रूझला संधी दिली. यामुळे त्याचा वारसा पुढे गेला; त्याचे नावही अजरामर झाले. पण, शरद पवारांच्या बाबतीत, हा निर्णय त्यांनी अजूनही घेतलेला नाही. वारसदार न निवडणे आणि पक्षातील अंतर्गत कलह यामुळे पक्षाला मोठे नुकसान झाले. आज ते राज्यसभेत जाऊन 'जिंकल्याचा अभिनय' करीत असले, तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. त्यांचा हा 'अभिनय' मराठी जनतेला पाहवत नाही. कारण त्यांना पवारांची हतबलता स्पष्ट दिसत आहे. एक काळ असा होता, जेव्हा शरद पवार हे राजकारणातील एक शक्तिशाली नेते होते, पण आज त्यांना एकाकी आणि पराभूत अवस्थेत पाहणे हे त्यांच्या चाहत्यांसाठी वेदनादायक आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना पूर्णपणे 'चेकमेट' केले आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत, यात शंका नाही. पण, बदलत्या काळासोबत बदलणे आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हे राजकारणात तितकेच महत्त्वाचे असते. असो... शरद पवारांना राज्यसभेसाठी शुभेच्छा!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# बालविवाह रोखा!

भारतातील विकासाचा आलेख झपाट्याने उंचावत असताना, काही सामाजिक प्रश्न अजूनही आपल्या पायातील बेडी ठरत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे बालविवाह. विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान आणि कायद्याच्या प्रगतीच्या काळात ही प्रथा अनेक भागात अजूनही जिवंत आहे, ही वस्तुस्थिती केवळ खेदजनकच नसून चिंताजनक आहे. बालविवाह हा केवळ एका कुटुंबाचा निर्णय नसतो. तो संपूर्ण समाजाच्या मानसिकतेचा आरसा असतो. एका बाजूला आपण 'नवभारत', 'डिजिटल इंडिया', 'महिला सशक्तीकरण' यासारख्या संकल्पनांचा गौरव करतो. दुसऱ्या बाजूला मुलींचे बालपण हिरावून घेणाऱ्या प्रथांकडे दुर्लक्ष करतो. ग्रामीण भारतात आजही अनेक ठिकाणी मुलीच्या जन्मापासूनच तिच्या विवाहाची चिंता सुरू होते. शिक्षण, करीअर, स्वप्ने यापेक्षा विवाहाला अधिक महत्त्व दिले जाते. लवकर लग्न म्हणजे सुरक्षित भविष्य ही चुकीची धारणा अजूनही पक्की आहे. गरिबी, अशिक्षण आणि सामाजिक दबाव यांचा संगम यामुळे बालविवाहाला खतपाणी घातले जाते. पण, या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे.

हा प्रश्न मुलींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतो. लहान वयात गर्भधारणा झाल्यास मातृ मृत्यूचा धोका वाढतो. बालकांचे आरोग्य धोक्यात येते. दुसरे म्हणजे, शिक्षणाचा मार्ग बंद होतो. शिक्षण ही प्रगतीची गुरुकिल्ली असताना, बालविवाह मुलींच्या हातातून ती किल्ली काढून घेतो. याहूनही गंभीर बाब म्हणजे मानसिक परिणाम. बालवयातच जबाबदाऱ्यांचा डोंगर उचलताना मुलींचे बालपण, स्वप्ने आणि आत्मविश्वास हरवतो. ती केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे, तर एक संपूर्ण पिढी म्हणून मागे पडते. २००६ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा सांगतो की, अशा विवाहांना मान्यता नाही. परंतु, कायदे कागदावरच असतात. त्यांची खरी ताकद अंमलबजावणीत असते. दुर्दैवाने अनेक ठिकाणी ही अंमलबजावणी अपुरी पडते. सामाजिक दबाव आणि पारंपरिक विचारसरणी कायद्यावर मात करतात. प्रश्न असा निर्माण होतो की, उपाय काय? सर्वप्रथम, शिक्षण हा सर्वात प्रभावी उपाय आहे. विशेषतः मुलींचे शिक्षण वाढविणे ही काळाची गरज आहे. शिक्षित मुलगी स्वतःचे आयुष्यच बदलत नाही तर, ती संपूर्ण कुटुंब आणि समाज घडवते. दुसरे म्हणजे, जनजागृती. समाजात बालविवाहाचे दुष्परिणाम स्पष्टपणे पोहोचविणे गरजेचे आहे. केवळ सरकारी योजना किंवा घोषणांनी हा प्रश्न सुटणार नाही. समाजाच्या मानसिकतेत बदल आवश्यक आहे. तिसरे म्हणजे, आर्थिक सक्षमीकरण. गरीब कुटुंबांना आधार दिल्यास बालविवाहाची गरज कमी होऊ शकते. अनेकदा आर्थिक अडचणीमुळे पालक हा निर्णय घेतात.

माध्यमांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन आणि सोशल मीडिया यांच्यामार्फत समाजाला जागृत करणे आवश्यक आहे. संपादकीय, लेख, चर्चासत्रे याद्वारे हा मुद्दा सतत जिवंत ठेवावा लागेल. तसेच स्थानिक प्रशासन, पोलिस आणि स्वयंसेवी संस्था यांनी अधिक सक्रिय भूमिका घ्यायला हवी. बालविवाह घडण्याआधीच तो थांबविणे ही खरी जबाबदारी आहे. परवा अकोला जिल्ह्यातील बाभुळगाव येथे जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या सतर्कतेमुळे होऊ घातलेला बालविवाह रोखण्यात आला. मुलीच्या पालकांकडून मुलीचा बालविवाह लावणार नाही, असे लेखी हमीपत्र घेण्यात आले. आजच्या युगात 'महिला सशक्तीकरण' हा शब्द केवळ घोषवाक्य म्हणून वापरण्यापेक्षा त्याचा खरा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण, स्वातंत्र्य आणि संधी दिल्याशिवाय सशक्तीकरण शक्य नाही आणि हेच बालविवाहाच्या विरोधातील सर्वात मोठे शस्त्र आहे. आज मुली मुलांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावत आहेत. आता तर, केंद्र सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव संसदेत पारित केला आहे. बालविवाह ही समस्या केवळ कायद्याने संपणार नाही; ती समाजाच्या सामूहिक प्रयत्नांनीच संपेल. प्रत्येक पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि नागरिकाने याविरोधात ठाम भूमिका घेतली पाहिजे. शेवटी, एक गोष्ट स्पष्ट आहे, बालविवाह थांबविणे म्हणजे केवळ एका मुलीचे आयुष्य वाचविणे नाही तर देशाच्या भविष्यास सुरक्षित करणे आहे. त्याचबरोबर बालविवाह हे मुलींचे बालपण हिरावून घेते. कळी उमलण्याआधीच कुचकरली जाते. ज्या वयात 'गुड टच बॅड टच'चे ज्ञान नसते, त्या वयात गर्भधारणासारख्या गंभीर बाबीला तिला सामोरे जावे लागते. तिची शारीरिक व मानसिक वाढ पूर्णतः न झाल्याने अल्पवयातच विविध व्याधी, आजार जडतात. अनेकदा अशा अल्पवयीन मातांचा बाळंतपणाच्यावेळी दुर्दैवी मृत्यूदेखील होतो. तिचा काहीही दोष नसताना तिला असह्य यातना सहन कराव्या लागतात. याचाच विचार करून शासनाने मुलगी १८ वर्षांची झाल्याशिवाय तिचा विवाह करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. तेव्हा, पालकांनी या कायद्याचे स्वतःहून पालन केले पाहिजे. कायद्याचे पालन न करणारे पालक आपल्या मुलींच्या जीवितत्वाशी खेळत आहेत. तेव्हा याचा विचार करून पालकांनी आपल्या मुलींचा विवाह तिचे वय १८ वर्षांचे पूर्ण झाल्यानंतरच करून द्यावा, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# प्रेमाच्या नावाखाली छळलं जाणारं 'हिंदुत्व'

'धर्मो रक्षति रक्षितः' जर आपण धर्माचे रक्षण केले, तरच धर्म आपले रक्षण करेल. हे आपल्याला लहानपणापासून शिकवलं जातं, मात्र त्याकरिता दुसऱ्याच्या धर्मावर अतिक्रमक करायला कधीही शिकवलं नाही. नेमकं याउलट 'लव्ह जिहाद'ला प्रोत्साहन देणारी शिकवण मुस्लिम समाजात दिली जाते, ही बाब गंभीर धार्मिक तेढ वाढवणारी, विद्वेष पसरवणारी आहे. महाराष्ट्राच्या मातीत सध्या एक अशीच अस्वस्थ करणारी लाट पाहायला मिळत आहे. ही लाट प्रगतीची नाही, तर सामाजिक वीण विस्कटणाऱ्या एका सुनियोजित षडयंत्राची आहे; ज्याला आपण 'लव्ह जिहाद' म्हणून ओळखतो. त्याचे स्वरूप आता केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित राहिलेले नसून ते आयटी हब आणि सुशिक्षित वर्गापर्यंत पोहोचले आहे. अमरावती ते पालघर आणि नाशिक ते पुण्यातील आयटी कंपन्यांपर्यंत पसरलेली ही जाळी हिंदू समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

### अमरावती-परतवाडा : ग्रामीण भागातील छळवणूक

विदर्भाचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या अमरावती आणि अचलपूर-परतवाडा परिसरात गेल्या काही महिन्यांत 'लव्ह जिहाद'ची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. येथे प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत किंवा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींना लक्ष्य केले जात आहे. ओळखीचे रूपांतर मैत्रीत आणि मैत्रीचे लग्नाच्या आमिषात करून या मुलींचे धर्मांतर करण्याचा दबाव टाकला जातो. परतवाडा येथील अलिकडील घटना पाहता, हे स्पष्ट होते की, ही केवळ वैयक्तिक प्रकरणे नसून यामागे एक मोठी साखळी कार्यरत आहे, जी हिंदू मुलींना फूस लावून बाटवण्याचे काम करीत आहे.

### नाशिक-पुणे : 'कॉर्पोरेट' लव्ह जिहादचे नवे संकट

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, आता सुशिक्षित आणि स्वावलंबी तरुणीही या जाळ्यात अडकत आहेत. नाशिकच्या टीसीएस आणि पुण्याच्या इन्फोसिससारख्या नामांकित कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या तरुणींना 'टार्गेट' केले जात आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात आयटी पार्क्समध्ये काम करणाऱ्या हिंदू मुलींना फसवण्यासाठी बनावट नावांचा आणि आधुनिक जीवनशैलीचा आधार घेतला जातो. नाशिकमध्येही आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे मानसिक शोषण केल्याच्या तक्रारी वाढत आहेत. नोकरीच्या मजबुरीचा फायदा घेत उच्चशिक्षित मुलींना अडवण्याचा हा नवा 'जिहाद'चा प्रयोग खरोखर धक्कादायक आहे. या चक्रव्यूहात अडकतात, तेव्हा समाजाच्या 'वैचारिक प्रगल्भतेवर' प्रश्नचिन्ह उभे राहते. हे गुन्हेगार केवळ अशिक्षित तरुण नसून ते



सुशिक्षित तरुणींच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यांना जाळ्यात ओढण्यात यशस्वी होत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

'लव्ह जिहाद' हा केवळ दोन व्यक्तींमधील प्रेमाचा विषय उरलेला नाही. हे एका विशिष्ट विचारसरणीने हिंदू समाजाची लोकसंख्याशास्त्रीय रचना बदलण्यासाठी चालवलेले 'डेमोग्राफिक युद्ध' आहे. हिंदू मुलींना लक्ष्य करणे म्हणजे हिंदू कुटुंबाची पायाभरणी उद्ध्वस्त करणे होय. जेव्हा एक हिंदू मुलगी धर्मांतरित होते, तेव्हा केवळ एक व्यक्ती जात नाही, तर येणारी संपूर्ण पिढी हिंदू धर्मापासून दुरावली जाते. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य संरक्षण कायदा अधिक प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. मात्र, केवळ कायदा पुरेसा नाही. 'कुटुंब प्रबोधन' आणि 'धर्म शिक्षण' या माध्यमातून आपल्या मुलींना धर्माचे महत्त्व पटवून देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे.'द केरळ स्टोरी' सारख्या चित्रपटांमधून जे वास्तव समोर आले, तेच वास्तव आज महाराष्ट्राच्या गल्लीबोळात आणि कॉर्पोरेट ऑफिसमध्ये पाहायला मिळत आहे. हे 'सॉफ्ट जिहाद'चे स्वरूप असून यात छुप्या पद्धतीने हिंदू संस्कृतीवर आघात केला जात आहे.

अमरावती, नाशिक, पुणे आणि पालघरमधील घटना या हिमनगाचे केवळ एक टोक आहेत. हिंदू समाजाने आता सावध होण्याची गरज आहे. आपल्या सणांचे, परंपरेचे आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी केवळ घोषणा देऊन चालणार नाही, तर आपल्या घरापासून संरक्षणाची भिंत उभी करावी लागेल. 'लव्ह जिहाद'चे हे संकट परतवून लावण्यासाठी शासन, प्रशासन आणि हिंदू संघटनांनी एकत्रितपणे लढा देणे काळाची गरज आहे.

### नव्या पिढीला धोका : 'लिबरलिझम'च्या नावाखाली फसवणूक

आजची तरुणाई स्वतःला 'ग्लोबल' आणि 'लिबरल' समजते. प्रेम धर्म पाहत नाही या वाक्याखाली ही पिढी वास्तवाकडे डोळेझाक करत आहे. 'लव्ह जिहाद' हे केवळ शारीरिक शोषण नसून ते 'वैचारिक धर्मांतर' आहे. तरुणाईला हे समजून घ्यावे लागेल की, हा विषय केवळ दोन व्यक्तींमधील प्रेमाचा नसून एका संस्कृतीला संपवण्याच्या षडयंत्राचा भाग आहे. एकदा का मुलगी या जाळ्यात अडकली की तिची अस्मिता, तिची श्रद्धा आणि तिचे स्वातंत्र्य कायमचे हिरावून घेतले जाते. लव्ह जिहाद हे हिंदू समाजापुढील 'अदृश्य युद्ध' आहे. अमरावती ते मुंबई असा हा जो प्रवास सुरू आहे, तो हिंदू संस्कृतीची पाळेमुळे उखडण्यासाठी आहे. जर आज आपण आपल्या मुलींच्या आणि धर्माच्या रक्षणासाठी उभे राहिलो नाही, तर उद्याचे भविष्य अंधकारमय असेल. सुशिक्षितपणाचा अर्थ 'सावधपणा' असा व्हायला हवा, 'गाफीलपणा' नव्हे. हिंदुत्वाचा हा लढा घराघरांत पोहोचविणे, हाच यावरील एकमेव प्रभावी उपाय आहे.

### पुरोगाम्यांचे दांभिक मौन : हिंदू मुलींच्या बलिदानावर गप्प का?

आजची तरुणाई स्वतःला 'ग्लोबल' आणि 'लिबरल' समजते. पण हाच उदारमतवाद त्यांच्या जीवावर बेतत आहे. लव्ह जिहाद हे केवळ शारीरिक शोषण नसून ते 'वैचारिक धर्मांतर' आहे. यावर उपाय काय? राज्यात कुठेही छोटी घटना घडली की गळे काढणारी 'पुरोगामी' मंडळी या लव्ह जिहादच्या प्रकरणांवर मात्र मूग गिळून गप्प आहेत. हिंदू मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त होत असताना या तथाकथित बुद्धिजीवींच्या 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याला' आणि 'स्त्रीवादाला' नेमकी कोणती बाधा येते? अल्पसंख्यक मतांच्या राजकारणासाठी हिंदू मुलींचा बळी दिला जात असताना हे लोक मौन पाळून एका अर्थाने या गुन्हेगारांना मूक संमतीच देत आहेत. प्रेम वैयक्तिक असते असे गोंडस नाव देऊन या षडयंत्राचे समर्थन करणे, हा या पुरोगाम्यांचा नवा धंदा झाला आहे. मात्र, जेव्हा याच मुलींची सुटकेसमध्ये प्रेते मिळतात, तेव्हा हे लोक कोठे गायब होतात? हिंदू समाजाच्या विनाशावर आपला अजेंडा चालवणाऱ्या या टोळीचा बुरखा आता फाडण्याची वेळ आली आहे.

९२७०३३३८८६

## अक्षय्य तृतीयेचे महत्त्व

अक्षय्य तृतीया, ज्याला 'आखा तीज' असेही म्हटले जाते, हा सण वैशाख महिन्याच्या शुद्ध तृतीयेला साजरा केला जातो. हा दिवस हिंदू धर्मातील अत्यंत शुभ व महत्त्वाचा दिवस मानला जातो. 'अक्षय' म्हणजे कधीही संपुष्टात न येणारे, जे कायम टिकून राहते. या दिवशी केलेल्या दान, पुण्य, जप, तप, हवन, पूजन, व्रत यांचे फळ अक्षय म्हणजेच अविनाशी आणि सात जन्मांसाठी कल्याणकारक मानले जाते. याच दिवशी पितरांना पाणी पाजण्याकरिता मातीचे कुंभ दान करून उन्हाळ्यात तयार करण्यात आलेले कुरडया, पापड, शेवया, आंब्याचे पन्हे, आमरस याचा नैवेद्य देवाला आणि पितरांना दाखवूनच खायला सुरुवात केली जाते. याच दिवसापासून घड्यातले पाणी पिण्याकरिता वापरले जाते. हिंदू पुराणांनुसार, या दिवशी भगवान परशुरामाचा जन्म झाला. याच दिवशी वेद व्यासांनी म्हणून पाद्य पूजन केले होते. म्हणून वैशाख महिन्यात ब्राह्मणांचे पाद्य पूजन (वसंत पूजा) वैदिक मंत्रजागर करण्याची प्रथा आहे. याच दिवशी पवित्र गंगा पृथ्वीवर अवतरली. अक्षय्य तृतीयेपासून वैशाख पौर्णिमेपर्यंत गंगा दशहरा पर्वकाळ म्हणून साजरा केला जातो. तसेच या दिवशी सोने-चांदी-धनसंपत्तीची देवता कुबेर हेही अवतरले. म्हणून या दिवशी सोने-नाणे विकत घेतल्यामुळे घरात भरभराट होते. याच मुहूर्तावर लग्न-मौंज केली जाते. या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून देवपूजा केली जाते. गायींना चारा ब्राह्मणांना अन्नदान व वस्त्रदान केले जाते.

**शिरीष पटवर्धन गुरुजी**/नागपूर-९४२२११००१५

●● ●●

## वाचक पत्रे

### धर्मांतर करायला भाग

नृशंस हत्या केल्याचेही प्रकार अनेकदा समोर आले आहे. भाजपा नेत्या देवयानी फरांदे यांनी अशा अपराध्यांचे राष्ट्रीयत्व रद्द करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी शासनाकडे मागणी केली आहे. केंद्र व राज्य सरकारने आता समग्र जनतेचा अधिक अंत न पाहता जबरी धर्मांतराचा, हिंदू मुलींवरील बलात्कार व क्रूर अत्याचाराचा कायमचा बीमोड करण्यासाठी फाशीच्या कडक शिक्षेसह कायदे अस्तित्वात नसल्यास असे कायदे पास करून त्यांना अविलंब अंमलात आणावे; तरच या जिहादी व जबरी धर्मांतर धुमाकुळाच्या नित्य घडत असलेल्या हैदोसाला आळा बसू शकेल. समग्र हिंदू समुदायानेही मिळमिळीत राहून व तटस्थपणे अशा रोज घडत

### डीजे, लेसर बीम आणि मिरवणुका

आजकाल मोठ्या आवाजाचे, लेसर बीमचे फॅड विविध धर्मांच्या मिरवणुकीत, शोभायात्रा, विवाह समारंभात फारच वाढले आहे. या आवाजावर कोर्टाने किती डेसिबल हवा, याचे निर्देश दिले आहेत. जास्त आवाजाने हृदय व कान आणि लेसर बीमने डोळे क्षतिग्रस्त होतात. मोठा आवाज हा मोठा आवाजच आहे, कोणत्याही जाती-धर्माशी त्याला काय? कोर्टाने डेसिबलचा नियम ठरवला आहे. तो सगळ्यांनीच पाळावा. पोलिस प्रशासनाने पण यांवर कारवाई करावी. पण एकतर्फी कारवाई होते असा आरोप होतो आहे, जे अयोग्य आहे. याचा त्रास सामान्यांना, आजारी, वृद्ध, लहान बाळांना होतो; जो कोणत्याही धर्माचा असू शकतो.

**रवी वाघमारे** / नागपूर

अस्वस्थता आणि असंतोष निर्माण झाला आहे. सरकारकडून हालचाली सुरू असल्या, तरी मूलभूत प्रश्न अनुत्तरितच आहे, तो म्हणजे मुली अशा सापळ्यात अडकतातच कशा? केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या उपक्रमामुळे मुली शिक्षणातच नाही तर उच्चशिक्षित झाल्या, करीअरमध्ये आणि विविध क्षेत्रांत अग्रस्थानी पोहोचल्या. आज त्या फायटर पायलटपासून प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वच ठिकाणी आपली छाप पाडत आहेत. मात्र, या प्रगतीसोबत त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. उच्चशिक्षण असूनही जर मुली अशा घटनांना बळी पडत असतील, तर केवळ शिक्षण पुरेसे नाही, हे स्पष्ट होते. यासाठी त्यांना धर्मशिक्षण देणे, त्यानुसार धर्माचरण करण्यास प्रोत्साहित करणे आणि स्वतःच्या मूळ शक्तिरूपाची ओळख करून देण्याची आवश्यक आहे. तसेच, स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देऊन जागृत आणि आत्मनिर्भर करण्याची वेळ आली आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# श्रमदानातून ऐतिहासिक बारवाची स्वच्छता व संवर्धन

## रोटरी क्लब व ब्राम्हण ऐक्य परिषदेचा उपक्रम



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | प्राचीन व पुरातन असलेल्या दासोपंत स्वामी समाधी परिसरात असलेल्या बारवाची स्वच्छता श्रमदानातून गुरुवारी सकाळी करण्यात आली. हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व ब्राह्मण ऐक्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने राबविण्यात आला.

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त अंबाजोगाई येथील दासोपंत महाराज समाधी परिसरातील ऐतिहासिक बारव (कुंड) येथे स्वच्छता व संवर्धन मोहीम उत्साहात व यशस्वीरित्या राबविण्यात आली.ही ऐतिहासिक बारव अंबाजोगाईच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक असून, तिचे जतन व संवर्धन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. या भावनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. या मोहिमेद्वारे स्वच्छतेसोबतच वारसा जतनाबाबत जनजागृती करण्याचाही संदेश देण्यात आला.

या उपक्रमात बारव परिसरातील कचरा, सुकलेली पाने, गवत व साचलेली घाण साफ करण्यात आली. तसेच परिसरातील नरसिंह मंदिर, महादेव मंदिर व मोकळा परिसर यांचीही स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात ब्राह्मण ऐक्य परिषदेचे सदस्य शैलेश कुलकर्णी, शैलेश गोस्वामी तसेच त्यांचे सर्व सहकारी, राहुल देशपांडे, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंके, सहसचिव राधेश्याम लोहिया, प्रा. अजय पाठक , डॉ अनिल केंद्रे आणि समस्त

# ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दहावी सी.बी.एस.ई निकाल दैदिप्यमान; ईगलवूडची जान्हवी वाघ जिल्ह्यात प्रथम 99.6%

तभा. वृत्तसेवा

**बीड** | फुले पिंपळगाव येथील ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दहावी CBSE बोर्डाचा निकाल यंदा अत्यंत दैदिप्यमान ठरला असून, शाळेने गुणवत्तेचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. एकूण १०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक परंपरेला अधिक बळकटी दिली आहे.

निकालाच्या तपशीलावर नजर टाकल्यास, तब्बल २१ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले, तर २५ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुणांची कमाई केली. तसेच १९ विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा अधिक आणि २० विद्यार्थ्यांनी ६०% पेक्षा अधिक गुण मिळवत एकंदर निकालाची गुणवत्ता उंचावली आहे. या यशस्वी कामगिरीमुळे शाळेचा निकाल सर्वार्थाने 'उत्कृष्ट' ठरला आहे.



या निकालात विशेष उल्लेख करावा लागेल तो वाघ जान्हवी हिचा. तिने तब्बल ९९.६०% गुण मिळवत केवळ शाळेतच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या भव्य यशाने शाळेचे नाव जिल्हाभर उज्ज्वल केले आहे. त्याचप्रमाणे सोलंके तेजस्विनी हिने ९८.४०% गुण मिळवत शाळेत द्वितीय क्रमांक पटकावला, तर सावंत लखन याने ९७.२०% गुण मिळवत तृतीय स्थान मिळवले. या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशाने इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.या निकालामध्ये विषयनिहाय प्रथम, द्वितीय आणि तृतीय गुण खालीलप्रमाणे आहेत. इंग्रजी विषयात वाघ जान्हवी हिने १०० गुण,मराठी १०० गुण, संस्कृत १०० गुण, माहिती तंत्रज्ञान या विषयात वाघ जान्हवी,राघव पवार, आदित्य आतकरे, सोळंके तेजस्विनी आणि अर्णव भुतडा या पाच विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळवले ,गणित विषयात वाघ जान्हवी व राघव पवार या दोघांनी ९५ गुण मिळवले ,विज्ञान विषयात वाघ जान्हवी व सोळंके तेजस्विनी या दोघींनी ९७ गुण मिळवले, सामाजिक शास्त्रात डाके महेश याने ९९ गुण, तर वाघ जान्हवी आणि सोळंके तेजस्विनी यांनी ९८ गुण मिळवले.

या दैदिप्यमान यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत तर आहेच पण त्याचबरोबर संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार मॅडम, सचिव डॉ. शरद पवार सर, विश्वस्त डॉ. सुशील भैय्या लोढा सर आणि शाळेचे प्राचार्य सत्यजित सर यांचे दूरदृष्टीपूर्ण नियोजन आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देत अभ्यासक्रमाचे प्रभावी नियोजन केले. नियमित चाचण्या, वैयक्तिक मार्गदर्शन, तसेच विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी घेतलेल्या विशेष सत्रांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.

शिक्षकांनीही आपल्या कर्तव्यनिष्ठेचा उत्कृष्ट प्रत्यय देत प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले. त्यांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशादर्शन केले, ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला आपली सर्वोत्तम कामगिरी करता आली. पालकांचा विश्वास, शिक्षकांचे अथक परिश्रम आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांचा संगम या निकालातून स्पष्टपणे दिसून येतो. ईगलवूड इंग्लिश स्कूलने या निकालाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

शाळेच्या या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी काळातही अशीच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# युगप्रवर्तक क्रिकेट चषक पोलीस संघाने पटकावला, दिमाखदार सोहळ्यात बक्षीस वितरण

## पो. नि.सुर्यतळ यांची फलंदाजीत दमदार कामगिरी

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव (प्रतिनिधी** | "युगप्रवर्तक चषक २०२६" या प्रतिष्ठित क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला असून,यंदाच्या स्पर्धेत पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या नेतृत्वात पोलीस प्रशासनाच्या संघाने शानदार कामगिरी करत चषकावर आपले नाव कोरले.ही स्पर्धा यंदा बाराव्या वर्षात पदार्पण करत असून,कर्मचारी वर्गासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांच्या वतीने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. कर्मचारी वर्गातील क्रीडागुणांना वाव देणे, शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे आणि एकात्मता दृढ करणे हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे.विशेष म्हणजे,या स्पर्धेत केवळ कर्मचारीच सहभागी होत असल्याने तिची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.यंदाच्या स्पर्धेत शहर व परिसरातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतील एकूण सहा संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. संपूर्ण स्पर्धेदरम्यान पोलीस प्रशासनाच्या संघाने शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीत इम्रान नाईक यांच्या नेतृत्वातील आय.के.एन.या बल्लाढ्य समजल्या जाणाऱ्या संघावर मात केली. आणि विजेतेपद पटकावले.बक्षीस वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते विजेत्या पोलीस प्रशासनाच्या संघाला "युगप्रवर्तक चषक २०२६" प्रदान करण्यात आला. तसेच स्पर्धेतील सामनाविराचा मान ओंकार थेटे यांनी,बेस्ट बॅटसमन पोलीस निरीक्षण राहुल सूर्यतळ यांनी व बेस्ट बॉलर सचिन मंजुळे यांनी पटकावला.विजेते व उपविजेते संघातील खेळाडूंना ट्रॉफी,सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल राऊत,डॉ.श्रीराम खळगे,जीवन नखाते,अमोल गायकवाड,परमेश्वर पांचाळ,प्रभाकर साळवे,गोरख उघडे,ममताजी गायकवाड,नितीन पुटवाड,शेख सलीम व संपूर्ण सामन्याची पंचगिरी अबू शेरा व ढकलू यांनी करून विशेष सहकार्य केले. या स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख शेख मतीन व नितीन पुटवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते. कार्यक्रमाचे संचालन नारायण भाळशंकर यांनी सर प्रस्ताविक भारतभाऊ टाकणखार यांनी केले.कार्यक्रमास बाळासाहेब सोनसळे सतीश डोने,प्रमोद साळवे,आनंद गायकवाड,प्रा.रोहित शेटे,डॉ.सुहास टाकणखार,पत्रकार विष्णू उगले,परमेश्वर सोळंके,बालासाहेब आडगळे तसेच सर्व सहभागी खेळाडू,पोलीस आदींची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत,अशा उपक्रमांमुळे कर्मचारी वर्गात एकजूट,शिस्त आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते,असे मत व्यक्त केले."युगप्रवर्तक चषक" स्पर्धेमुळे शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून,भविष्यातही अधिक मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आयोजित करण्याचा संकल्प आयोजक वसंतभाऊ टाकणखार, शिवाजी भाळशंकर,अभिमन्यू इबिते,राजकुमार सोनवणे, किरण शिंदे,प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,राहुल खुणे,निलेश गावडे,अमोल राऊत,अजमुद्दीन खतीब,सुमेध घाडगे,प्रतीक स्वामी यांनी व्यक्त केला.

**पो. नि.सुर्यतल यांचे स्पर्धेत ३१ षटकार** | युगप्रवर्तक क्रिकेट स्पर्धेत एकून ३१ षटकार ठोकून धुवांधार बॅटिंग करून उत्कृष्ट फलंदाजीची प्रदर्शन केले.

# शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सवाला बीडमध्ये उत्साहात सुरुवात



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | बीड शहरात ग्राहकांना नैसर्गिक, सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने "शाश्वत कृषी उत्पादन प्रदर्शन व विक्री तसेच आंबा व धान्य महोत्सव २०२६" चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दिनांक १७, १८ व १९ एप्रिल २०२६ रोजी अमृत मंगल कार्यालय, सुभाष रोड, बीड येथे होणार असून, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत (FPO) शेतकरी स्वतः तयार केलेली उत्पादने येथे विक्रीसाठी उपलब्ध करून देणार आहेत. या प्रदर्शनात गावरान मध, मोरिंगा पावडर, गायीचे तूप, खवा-पेढे, विनापोलिश तांदूळ, नैसर्गिक गूळ, मसाले, ज्वारी चिवडा तसेच ताजे आंबे यांसारखी विविध उत्पादने ग्राहकांना पाहायला व खरेदीसाठी उपलब्ध राहतील. या उपक्रमामागील मुख्य उद्देश शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट संवाद वाढवणे, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण पर्याय उपलब्ध करून देणे हा आहे.

या महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन शिता ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, शिरूर कासार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कवडगाव येथे वैराग्य महामेरु श्री संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी साजरी



**कवडगाव प्रतिनिधी** | वडवणी तालुक्यातील कवडगाव ,(बु) येथे श्री संत वैराग्यमूर्ती महामेरू व संत परीक्षक गोरोबाकाका यांची पुण्यतिथी मोठे उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली या पुण्यतिथी उत्सवानिमित्त गावातील भजनी मंडळांनी सकाळी १०ते १२ या वेळेत संगीत भजन आयोजित करण्यात आले होते. या पुण्यतिथी उत्सवाला गावातील हभप चोले महाराज ह भ प बबन महाराज शिंदे,पखवाज वादक ह भ प महादेव महाराज पवळ ,कांता महाराज मुंडे, श्रीहरी महाराज मुंडे, बजरंग महाराज चव्हाण, दत्ता महाराज लेंडाळ, बाबु जोगदंड,आश्रुबा शेजाळ, बाबरे महादेव, बाबासाहेब रासवे, जगन काळे,शुभम उंडाळकर, अशोक उंडाळकर, डॉ.महादेव करडकर, वडवणी तालुका अध्यक्ष बळीराम करडकर यांच्यासह गावातील माता भगिनी भजनी मंडळ व बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कवडगाव येथील कुंभार समाज बांधवांनी पुढाकार घेतला होता.

# जीवनातील अंधार संपवायचा असेल तर भीमज्योत तेवत ठेवा ; डॉ.राजेश इंगोले

## भीमाई नगर येथे भीमजयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | सध्या देशात एकीकडे जातीयतेचा आणि धर्मांधतेचा विषारी विचार पसरवला जात असताना, दुसरीकडे मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वातंत्र्य, समता व न्यायाचे विचार हीच खरी भीमज्योत असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त साकूड रोड, भीमाई नगर येथे भीमजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी गायकवाड व वैदेही वाघमारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रशांत पोटभरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जयंती समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल जोगदंड, उपाध्यक्ष मंगेश दासूद, कोषाध्यक्ष सुमित साळवे, तुकेश कचरे,



प्रशांत पोटभरे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ.राजेश इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती, तर संरक्षण शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.किरण चक्रे व्याख्याते म्हणून लाभले होते. यावेळी बोलताना डॉ.इंगोले म्हणाले की, आज समाजात द्वेषाचे, असमानतेचे वातावरण जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे. अशावेळी बाबासाहेबांची भीमज्योत म्हणजेच शिक्षण, समता आणि विज्ञानवादी दृष्टिकोन, अन्यायाविरोधात लढा तेवत ठेवणे हीच खरी भीमजयंती. जोपर्यंत ही भीमज्योत तेवत राहील, तोपर्यंत जातीयतेचा आणि धर्मांधतेचा अंधार मानवी मूल्यांना पराभूत करू शकणार नाही. त्यांनी तरूणांना बाबासाहेबांच्या शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या मंत्रानुसार वाटचाल करत शासनकर्ती जमात बनण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. व्याख्याते प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी डॉ.आंबेडकरांचे संरक्षण क्षेत्र आणि राष्ट्र उभारणीतील योगदान यावर प्रकाश टाकला. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आज भारताला महासत्ता बनविण्यासाठी कसे मोलाचे आहेत, हे त्यांनी सविस्तरपणे सांगितले. कार्यक्रमाला भीमाई नगर परिसरातील नागरिक, महिला व तरूण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरूवातीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला डॉ.राजेश इंगोले, प्रा.डॉ.किरण चक्रे व जयंती समितीचे अध्यक्ष प्रफुल्ल जोगदंड, राहुल कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामूहिक भीमवंदना घेण्यात आली.

# महिला सक्षमीकरणासाठी नारीशक्ती वंदन अधिनियम हा ऐतिहासिक कायदा ठरणार - रुपाली कचरे



तभा. वृत्तसेवा

**बीड** | देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देऊन सशक्त भारताच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे .

याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने नारीशक्ती वंदन अभियानाला समर्थन देण्यासाठी दिनांक १६ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी सायंकाळी मंगलनाथ मंदिर येथे विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या महिलांनी या नारीशक्ती वंदन अधिनियम कायद्याला समर्थन देण्यासाठी उपस्थित राहिल्या व पंतप्रधान नरेंद्र मोदी , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण नामदार पंकजा मुंडे मा. खा. प्रीतम मुंडे यांचे अभिनंदन करून धन्यवाद मानले .

प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करताना तालुकाध्यक्ष रूपाली कचरे म्हणाल्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून महिलांच्या राजकीय आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा ऐतिहासिक टप्पा ठरणार असून नेतृत्व विकासाला चालना मिळेल व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढणार व समाज देखील अधिक समतोल व सक्षम होईल असे मत भाजपाच्या कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्षा रूपाली कचरे यांनी व्यक्त केले.

# कत्तलीसाठी नेले जाणारे गोवंश जप्त; आरोपी अटकेत

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरात बुरुज तलावासमोर गुरुवारी दुपारी पोलिसांनी मोठी कारवाई करत कत्तलीसाठी घेऊन जाणारा गोवंश जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही यशस्वी कारवाई केली. यामध्ये तीन जर्सी गायी आणि एका गोऱ्यासह सुमारे साडेतीन लाख रुपयांचा & मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरो ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस कॉन्स्टेबल युवराज राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास एका अशोक लेलँड टेम्पोमध्ये गोवंशीय जनावरे अत्यंत निर्दयीपणे कोंबून कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी पंचासह बुरुज तलाव परिसरात छापा टाकला असता, संशयित वाहन क्रमांक एमएच २५ एजे ६५८६ मिळून आले. या वाहनाची तपासणी केली असता त्यात तीन गायी आणि एक गोरा अत्यंत दाटीवाटीने आणि क्रूरपणे बांधलेले आढळले.

या कारवाईत पोलिसांनी आरोपी दशरथ शंकर जगदाळे, राहणार हिवरा, जिल्हा धाराशिव याला अटक केली आहे. जप्त केलेल्या जनावरांची किंमत ४३ हजार रुपये असून वाहनासह एकूण ३ लाख ४३ हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी हस्तगत केला आहे. आरोपीनू या मुक्या प्राण्यांना चारा पाणी न देता कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक करून प्राण्यांचा छळ केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अमोल गायकवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

काल सायंकाळी आंबेजोगाई शहर पोलीस प्रशासनाच्या वतीने तीन गाई व एक नंदी यांना जीवदान देण्यात आले अनोळखी व्यक्ती हा त्याच्या पिकअप मध्ये गाईंना कतलीसाठी घेऊन आला असल्याची बातमी समजताच पोलिस घटनास्थळावर पोहचले व वाहनचालकास ताब्यात घेऊन चौकशी केली असता हा त्याच्या वाहनातअत्यंत क्रूरपणे गाईंना बांधून कत्तलीच्या उदेशाने त्याने 3 गाई व एक नंदी यांना कतली साठी घेऊन आला आहे .अशी खात्री झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींस वाहना सकट पकडले व त्यावर गुन्हा नोंद करून 3 गाई व एक नंदी यांना ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी व संगोपनासाठी वरवटी येथील गोशाळेत वर्ग केले. असे ॲड अशोक मुंडे यांनी म्हटले आहे.

# धर्मरक्षक परशुराम आणि अक्षय तृतीया



हिंदू पौराणिक कथेनुसार आठ महापुरुष अमर मानले जातात जसे अश्वथामा ,राजा बली, महर्षी वेदव्यास ,हनुमानजी, बिभीषण, कृपाचार्य, परशुराम, ऋषी मार्कंडेय या सर्वांनी मृत्यूला जिंकले आणि अमर झाले. अशा आठ महापुरुषांपैकी परशुराम जे ऋषी महर्षी जमदग्नी आणि रेणुका माता यांचे पुत्र आणि भगवान विष्णू यांचे सहावे अवतार चिरंजीव (अमर) मानले गेले. यांची वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तिसऱ्या दिवशी जयंती साजरी केली जाते. त्यांचे मूळ नाव राम होते परंतु हातात नेहमी परशु (कुऱ्हाड) धारण केल्यामुळे त्यांचे परशुराम असे नाव पडले .भगवान परशुराम हे केवळ योद्धा नव्हते तर ते महान गुरु देखील होते. अनेक योद्धांना त्यांनी शिक्षण दिले. शस्त्रविद्या ,शौर्य ,नैतिकता, अन्यायाविरुद्ध लढा, आज्ञाधारकता, गुरुभक्ती, त्याग भावना, धर्मसंरक्षण ,संघर्षाला सामोरे जाण्याची प्रेरणा आपल्याला भगवान परशुराम यांच्याकडून मिळते .

हिंदू धर्मातील अत्यंत शुभ साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेला सन म्हणजे अक्षय तृतीया . या दिनी श्री गणेश, लक्ष्मी आणि विष्णूचे नामस्मरण आणि पूजा, हवन केले जाते. पूजा केल्याने सुख, शांती, समृद्धी प्राप्त होते.गुळ आणि दुधापासून बनवलेले गोड पदार्थ ,आमरस, पुरणपोळी यांचा नैवेद्य दाखवून दानधर्म, उपवास ,सत्कर्म, सत्वचन ,अत्यंत पवित्र मानले जाते .या दिवशी केलेले कार्य कधीही नष्ट न पावणारे म्हणजेच अक्षय असे मानले जाते. देव आणि पितर यांना उद्देशून जे कर्म केले जाते ते अविनाशी होते.

भारतीय संस्कृतीमध्ये पोषण आणि समृद्धीची प्रतिक असलेले तांदूळ याला अत्यंत पवित्र मानले आहे . प्रत्येक कार्यामध्ये व आहारामध्ये याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून तांदळाचा योग्य वापर आरोग्यास हितकारक आहे. तांदळामध्ये वेगवेगळे प्रकारचे पौष्टिक तत्वे असल्याकारणामुळे बालकापासून वयोवृद्ध पर्यंत पचनास हलके आहे . तसेच तांदूळ हा कार्बोहायड्रेट चा मुख्य स्रोत असून शरीराला ऊर्जा देते प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे (लोह, पोटॅशियम) फायबर युक्त आणि ऊर्जा वाढविण्यास मदत करणारे, शरीराच्या वाढीसाठी उपयुक्त .या शुभ दिनी तांदूळ सैंधव मीठ धने यांची खरेदी केली असता समृद्धी टिकून राहते. तसेच इतर मौल्यवान वस्तू (चांदी ,सोने) वाहने ,घर , मालमत्ता ,कपडे गरजूंना दानधर्म ,नवीन प्रकल्प, गुंतवणूक इत्यादी अक्षय अनंत शाश्वत राहते. स्वच्छ जागेवरती पाटावर लाल किंवा पिवळा कपडा पसरून त्यावरती तांदूळ ठेवून मातीचा किंवा तांब्याचा कलश( अक्षय पात्र) ठेवून त्यामध्ये तांदूळ सोने ,पैसे ,धने विष्णू लक्ष्मी यांची पूजा केली असता घरातील ऐश्वर्य टिकून राहते . जीवनात प्रगती करत असताना आपल्या दिवंगत पूर्वजांचा आदर आणि स्मरण करण्याचा हा दिवस.

परशुराम जयंती आणि अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असल्याने कोणतेही शुभ कार्य करताना या दिनी मुहूर्त पाहण्याची गरज लागत नाही.पौराणिक कथेनुसार त्रेता युगाची सुरुवात देखील अक्षय तृतीयेच्या दिवशी झालेली होती. त्याचबरोबर भागीरथीच्या कठोर तपश्चर्येने प्रसन्न होऊन गंगादेवी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली होती. महर्षी व्यास यांनी महाभारताचे लेखन सुद्धा आजच्या दिनी सुरु केले होते. श्रीकृष्णाने पांडवांना वनवासात अक्षय पात्र दिले जे कधीच रिकामे होत नव्हते ज्यातून पांडवांना अन्न मिळत होते तेही अक्षय तृतीयेच्या दिनी. तसेच देवी पार्वतीचा अवतार असलेल्या अन्नपूर्णा देवीनी याच दिवशी भगवान शंकराला अन्न स्वरूप भिक्षा घातली होती त्यामुळे अन्नधान्य आणि स्वयंपाक घराची पूजा करावी, भुकेलेल्याना अन्न द्यावे, तहानलेल्यांना पाणी द्यावे, दानधर्म करत राहावे, प्राणीमात्रांवर दया करावी हा संदेश देखील यातून आपणास मिळतो . अशाप्रकारे मन प्रफुल्लित करून संपत्ती, समाधान आणि आनंद आपणही आपल्या आयुष्यात अक्षय टिकूयात.

सौ .अश्विनी वासुदेवराव टेकाळे (जोशी)
सहशिक्षिका .बीड

# केज येथे पाऊणतास रस्ता रोको : प्रशासनाच्या लेखी आश्वासानंतर आंदोलन मागे

केज : केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघातीय मृत्यूनंतर निर्माण झालेल्या शंकामय बाबीचीं सखोल चौकशी करा, कानडी रोड नादुरुस्त रस्ता चोवीस तासात दुरुस्त करा व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृह 15 ऑगस्ट पूर्वी केज नगरपंच्यायत कडे हस्तान्तरीत करा या तीन प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीने शुक्रवारी केज तहसील कार्यालयासमोरील महामार्गांवर पाऊणतास केलेले रस्ता रोको आंदोलन अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासानंतर मागे घेण्यात आले.

वरील तिन्ही मागण्यासंदर्भात प्रशासनाने दखल घेवून लेखी आश्वासन दिले. या अंतर्गत मयत तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघात व मृत्यूचीविशेष चौकशी स्थानिक गुन्हा शाखेकडे सोपवल्याचे सांगण्यात आले व घटनेचे संपूर्ण सत्य शोधून काढले जाईल असे सांगण्यात आले.

अपूर्ण असलेल्या कानडी रस्त्याचे दोन्ही बाजूचे पंखे भरुन येत्या 20 एप्रिल पूर्वी रस्ता काम पूर्ण करण्यात येईल तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम 15 ऑगष्ट पूर्वी पूर्ण करून ते केज नगरपंचायत कडे सोपवले जाईल असे लेखी आश्वासन संबंधित यंत्रनेने दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि मोहनराव कराड, संपत वाघमारे, गौतम बचूटे यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# हळदवाडी साठवण तलावामुळे २९८ हेक्टर शेती सिंचनाखाली येणार- आ. मुटकुळे

## तळपत्या उन्हात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली तलावाची पाहणी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

तालुक्यातील हळदवाडी येथे ३९ कोटीच्या निधीतुन सुरु असलेल्या साठवण तलावाच्या प्रगतीपथावर असलेले हे काम आता पूर्णत्वाकडे असून, यामुळे परिसरातील सिंचनाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. तलावाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच हे काम पूर्ण होऊन पाणी साठवण्यास सुरुवात होईल. या साठवण तलावामुळे सुमारे २९८ हेक्टर शेती सिंचनाखाली येणार असल्याची माहिती आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.

भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी विधानसभा मतदार संघात विकास कामांचा आढावा घेण्यास सुरूवात केली आहे. यापूर्वी त्यांनी १४८ एकरात पसरलेला शहरातील सिरेहक शाह बाबा तलावाल भेट दिली तसेच तेथील विकास कामांची त्यांनी पाहणी करीत या तलावासाठी निधी मंजूर करून घेतला आहे. तसेच शहरातील हिंदू धर्मियांचे श्रध्दास्थान असलेला जलेश्वर तलावाचे कामाची पाहणी केली तसेच जलेश्वर तलावाचे उर्वरित राहीलेल्या कामाल निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले .

दि १८ एप्रिल रोजी भर उन्हात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी तालुक्यातील हळदवाडी साठवण तलावाची प्रत्यक्ष जाऊन कामाच्या दर्जाची आणि प्रगतीची पाहणी केली. तसेच काम विहित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि कंत्राटदाराला त्यांनी दिल्या.

या तलावामुळे हळदवाडी आणि परिसरातील गावांच्या भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत होईल, तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी शाश्वत पाण्याचा स्रोत उपलब्ध होईल.तलावाचे काम आता पूर्णत्वाकडे असून लवकरच ते पूर्ण होईल.या साठवण तलावामुळे परिसरातील एकूण २९८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.या प्रकल्पामुळे हळदवाडी आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याचे आ.मुटकुळे यांनी सांगितले.

या पाहणीच्या वेळी जेष्ठ नेते के.के शिंदे, संतोष टेकाळे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, हिंगोली ग्रामीण मंडळ अध्यक्ष माणीक लोडे, सहाय्यक अभियंता प्राजक्ता भुजाडले, स्थापत्य सहाय्यक शुभम भोपळे, स्थापत्य सहाय्यक तेजल भुसाटे,कंत्राटदार आसाराम घुगे, सरपंच शंकर शिंदे, प्रल्हादराव शिंदे, रुस्तुम शिंदे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ, पदाधिकारी उपस्थित होते.

# वसमतच्या तहसीलदारांचे निलंबन रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीकडे दुर्लक्ष केल्याच्या आरोपातून वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांचे निलंबन करण्यात आले. सदरील निलंबन हे अन्यायकारक असून द्वेषापोटी केल्याचा आरोप करीत तहसीलदार दळवी यांचे निलंबन रद्द करण्याची मागणी काही नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांचे काही दिवसांपूर्वी निलंबन करण्यात आले. जिल्ह्यात मागील काही दिवसांत गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही केली जात आहे. यामध्ये महसूल विभागाने तालुकास्तरावर तसेच पोलिस विभागानेही स्वतंत्र पथके स्थापन करून कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यामुळे वाळू माफीयांना लगाम बसला आहे.

वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांनी मागील अडीच वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यात सर्वात जास्त वाहनांवर कारवाई केली आहे. त्यांच्या कालावधीत वसमत तालुक्यातील तब्बल १५५ वाहनांवर कारवाई करण्यात आली. वाहनांना २ कोटी ९१ लाख रूपयांचा दंडही लावण्यात आला आहे. याशिवाय संबंधितांवर गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी नांदेडहून येणाऱ्या वाहनांवरही कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त कारवाई असतानाही तहसीलदार शारदा दळवी यांच्यावर गौण खनिज उत्खनन व वाहतुकीकडे दुर्लक्ष केल्याच्या आरोपातून त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. सदरील कार्यवाही ही द्वेषभावनेतून झाल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकारामुळे अधिकाऱ्याचे खच्चीकरण होत आहे. तहसीलदार शारदा दळवी यांच्यावरील निलंबनाची कार्यवाही रद्द करावी अशी मागणी दिपक कदम, अलोक इंगोले, करण जाधव, अंकुश कोरडे यांच्यासह नागरिकांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे.

# शहरातील दुकानफोडी प्रकरणातील चोरट्यांना जेरबंद करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

शहरात मागील काही दिवसांपासून सलग दुकानफोडीच्या घटना घडत आहेत. अज्ञात तीन इसमांनी अनेक दुकानांचे शटर वाकवून चोरी केल्याची गंभीर घटना घडली आहे. या चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी व्यापारी महासंघाने पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांची भेट घेवून त्यांना निवेदन सादर केले आहे.



शहरातील चिंतामणी मेडिकल, अजय अशोक मंदाडे (किराणा दुकान), राहुल माणिक वाढवे यांच्या श्रेय डिस्ट्रीब्यूटर्स, विशाल सुभाष डोरले यांचे (साईलीला मेडिकल), चंद्रशेखर श्रीरामअप्पा उबाळे यांचे तुळजाई मेडिकल फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ३३ हजार रूपयांची रक्कम लंपास केली आहे.

या घटनेला दहा दिवस उलटूनही अद्याप कोणताही ठोस तपास लागलेला नाही. यामुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, याबाबत हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची भेट घेऊन निवेदन दिले व सविस्तर चर्चा केली. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यात येईल, तसेच शहरात रात्रीची गस्त वाढविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी नंदकिशोर तोष्णीवाल (अध्यक्ष), अनिल नैनवाणी (राज्य उपाध्यक्ष), राजेश बगडिया (उपाध्यक्ष), सुमित चौधरी (शहराध्यक्ष), रविंद्र सोनी, माबुद बागबान (उपाध्यक्ष, नगर परिषद हिंगोली), शेख मुजीब, शेख जुबेर मामू, राहुल वाढवे, अनिल कोंडेकर, उमेश बोडके, अजय मंदाडे यांची उपस्थिती होती.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिव्यांग बांधवांची आढावा बैठक घेतली. यावेळी दिव्यांगांच्या अडीअडचणी जाणून घेवून त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी अधिकारी गीता गुठ्ठे, दिव्यांगचे जिल्हाध्यक्ष किसन मुटकुळे, श्रीकांत कऱ्हाळे, जगन कुटे, शेषराव कावरखे, अर्जून गांजवे, रंगनाथ मुटकुळे, हिरामण पोप्ते आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### २० ते २२ एप्रिल दरम्यान वादळी पाऊस

हिंगोली- पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत. काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत, वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये.

### भूदान चळवळीबद्दल विनोबा भावे यांना अभिवादन



हिंगोली- हिंसा, बेरोजगारी, अशांततेवर संवादातून तोडगा शोधण्यासाठी पादाक्रांत करणाऱ्या भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांनी उभारलेल्या भूदान चळवळीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि. १८ शनिवारी वसमत अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालय, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन उपक्रम पार पडले. प्रारंभी आचार्य विनोबा भावे, प्रथम भूदाते रामचंद्र रेड्डी यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. आचार्य विनोबा भावे यांना १८ एप्रिल, रोजी विधिज्ज्ञ रामचंद्र रेड्डी यांच्याकडून आंध्र प्रदेशातील पोचमपल्ली येथे पहिले भूदान झाले. भूदान घटनेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. सुईच्या टोकाएवढी देखील जमीन देणार नाही अशा भूमिकेतून महाभारत घडलेल्या भारतीय भूमीवर दानविरांनी लाखो एकर जमीन दान केली. हि प्रबोधनात्मक किमया चर्चा, संवाद, पदयात्रेतून आचार्य विनोबा भावे यांनी साध्य केली

# ११५ वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११५ वाहन चालकांविरोधात पोलिस विभागाच्यावतीने कार्यवाही करण्यात आली. वाहन चालकांकडून ९० हजार २०० रूपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात अवैधदारू विक्री करणाऱ्या चार ठिकाणी पोलिसांनी छापा मारला. आरोपीताकडून ४ हजार ९१० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत आरोपीताविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले. दोन ठिकाणी जिल्ह्यात जुगार अड्डयावर धाड टाकण्यात आली.

# संसदेत नारी शक्ती वंदन विधेयक नामंजूर झाल्यामुळे शिवसेनेच्यावतीने काँग्रेसचा निषेध करीत थाली बजाओ आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

संसदेत नारी शक्ती वंदन विधेयकाला काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमुल काँग्रेस, डीएमके यासह इंडिया आधाडीच्या पक्षांनी विरोध करीत विधेयकाच्या विरोधात मतदान केले. त्यामुळे हे विधेयक संसदेत नामंजूर झाले. त्यामुळे हिंगोलीतील शिवसेना शिंदे गटाच्या वतीने काँग्रेससह इतर पक्षांचा तीव्र निषेध करीत खा राहुल गांधी यांचे प्रतिकात्मक छायाचित्र घेवून थाली बजाव आंदोलन करण्यात आले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रातील सरकारने दि १६ आणि १७ एप्रिल रोजी विशेष अधिवेशन घेवून देशातील अर्धी जनसंख्या असलेल्या महिलांना हक्क मिळवून देण्यासाठी नारीशक्ती विधेयक संसदेत सादर केले. या विधेयकाला काँग्रेसचे नेते खा राहुल गांधी यांच्यासह समाजवादी पक्ष, तृणमुल काँग्रेस, डीएमके यांच्यासह इंडिया आघाडीतील पक्षांनी विरोध करीत नारी शक्ती वंदन विधेयकाच्या विरोधात मतदान करीत हे विधेयक पाडले. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के प्रतिनिधीत्व या विधेयकामुळे मिळणार होते. परंतु काँग्रेस आणि त्यांच्या मि९ पक्षांनी या विधेयकाच्या विरोधात संसदेत मतदान केले. यावरून काँग्रेस आणि त्यांच्या पक्षामध्ये महिलांबद्दल असलेली भावना लक्षात आली असून महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

संसदेत विधेयक नामंजुर झाल्यानंतर विरोधकांनी जयनाद केलेला देशातील सर्व महिलांनी पाहीला असून काँग्रेसचे नेते खा राहुल गांधी, खा प्रियंका गांधी यांची मानसिकता देशातील महिलांच्या लक्षात आली आहे. नारी शक्ती वंदन विधेयकाला विरोध करणारे खा राहुल गांधी यांचे प्रतिकात्मक छायाचित्र घेवून काँग्रेसचा तीव्र निषेध करीत काँग्रेस विराधोत घोषणा बाजी करीत महिलांनी थाळी बजाव आंदोलन केले. यावेळी आ. संतोष बांगर, नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर, नगराध्यक्षा सौ आश्लेषा वैभव चौधरी, महिला जिल्हा प्रमुख रेखा देवकते, गटनेते श्रीराम बांगर, नगरसेवक विशाल गोटरे, नगरसेवक कपील खंडेलवाल, मनोज बांगर, संजय राठोड, अनिल देव, ज्योती वाघमारे, सुवर्णा गाभणे, सारीका चांदणे यांच्यासह महिलांची उपस्थिती होती.

# वंचीतचे शिरड शहापूर येथे दोन तास रास्तारोको

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १८ एप्रिल**

तालुक्यातील शिरडशहापूर आणि जवळा बाजार समितीमधील कथित भ्रष्टाचार व शेतकऱ्यांच्या लुटीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली शिरडशहापूर येथे आज दि १७ एप्रील रोजी तीव्र आंदोलन दोन तास रास्ता रोको करून करण्यात आले. वंचित बहुजन आघाडी माजी जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



आंदोलनकर्त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक लूट, बेकायदेशीर 'कट्टी', पेमेंटमध्ये होणारा विलंब, भूखंड घोटाळा, नियमबाह्य नोकरभरती आणि सीसीआय कापूस खरेदीतील बनावटगिरी याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शेवटी आंदोलनाची तीव्रता पाहता संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन आंदोलकांशी चर्चा केली. या चर्चेनंतर सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तत्काळ निर्णय घेतला जाईल, असे लेखी स्वरूपात आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

यावेळी शेतमाल विक्रीनंतर २४ तासांत पैसे देणे बंधनकारक असतानाही ७-८ दिवस विलंब करणे, प्रति पोते २.३०० किलोपर्यंत बेकायदेशीर 'कट्टी', मोठा आर्थिक तोटा करणे,वजन काट्यांमध्ये फेरफार करून शेतकऱ्यांची फसवणूक करणे, जवळा बाजार समितीत भूखंड वाटपात अनियमितता शासन स्थगिती असूनही नोकरभरती प्रक्रियेत गैरप्रकार सीसीआय कापूस खरेदीत बनावट ७/१२ उतारे वापरून फसवणूक करणे आदी मुद्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

जिल्हा निबंधक प्रतिनिधी एम यु. यादव यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.१५ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीने दिला आहे. या आंदोलनामुळे शिरड शहापूर परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते, मात्र प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. यावेळी पोलीस निरीक्षक जी.एस. राहिरे, पोलिस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे पोलीस व त्यांच्या पथकाने चोख बंदोबस्त ठेवला. या आंदोलनात अनिल कांबळे,आनंद ढेंबरे, श्यामसुंदर ठोंबरे, यश राठोड, मुंजाजी जोगदंड, अनिकेत गायकवाड,आसिफ रजा, उमेश रावले, केशव शेळके, अनिल टाकणखार, दीपक बेले, रमेश इंगोले, सय्यद रशीद, अजहर चाऊस, सोफियान चाऊस, इसाक बागवान,यशवंत कांबळे मोठ्या संख्येने शेतकरी व व्यापारी सहभागी होते.

# वसमतमध्ये तापमान वाढीमुळे रस्ते निर्मनुष्य

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १८ एप्रिल**

शहरासह परिसरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, एप्रिल महिन्याच्या मध्यावरच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरुवात केली आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागते, तर दुपारच्या सुमारास उष्णतेचा कडाका अधिक वाढत आहे. परिणामी, दुपारच्या वेळेत शहरातील बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी नेहमीची वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत असून, अत्यावश्यक कामे सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा पूर्ण करण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी शहरातील प्रमुख चौक, व्यापारी संकुले आणि रस्ते तुलनेने ओस पडलेले दिसत आहेत. काही भागांत तर दुपारी अगदी विरळच वाहतूक आणि हालचाल सुरू असल्याचे चित्र आहे.

उष्णतेचा फटका व्यापारी व व्यावसायिकांनाही बसत असून, दुपारच्या सुमारास ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याची माहिती स्थानिक व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे काही दुकानदारांनी दुपारच्या वेळेत दुकाने अर्धवेळ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेरीवाले आणि रस्त्यावरचे विक्रेतेही उन्हाच्या तीव्रतेमुळे कमी प्रमाणात दिसत आहेत.

वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तरुण भारत
www.tarunbharat.org

# पालकमंत्र्यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आढावा

भा वृतसेवा
ांदेड, दि. १८ एप्रिल -

जिल्ह्यात अलीकडे घडलेल्या गंभीर ्न्ह्यांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था नबाधित राखण्यासाठी पोलीस विभागाने ाधिक दक्षता घ्यावी, तसेच शांतता व ुरक्षिततेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना ाबवाव्यात, असे निर्देश पालकमंत्री अतुल ावे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या ाध्यक्षतेखाली कायदा व सुव्यवस्थेबाबत ठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल र्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, ाप्पर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक आश्विनी जगताप, अर्चना पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नांदेड शहरात महिन्याच्या सुरुवातीला दोन दिवसांत घडलेल्या पाच खुनांच्या घटनांचा उल्लेख करत पालकमंत्री श्री. सावे यांनी ही बाब चिंताजनक असल्याचे नमूद केले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

शहर व जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर विशेष लक्ष ठेवावे, एमपीडीए अंतर्गत



कारवाई वाढवावी, तसेच अचानक धाडी टाकून गुन्हेगारीला आळा घालावा, असेही त्यांनी सांगितले. अवैध वाळू उत्खनन, गुटखा, मटका व अंमली पदार्थांवर कठोर कारवाई करावी तसेच कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी स्थानिक गुप्तवार्ता वाढविण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस विभागाच्या अडचणी शासन स्तरावर सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत, सीसीटीव्ही प्रकल्प, पदभरती, पोलीस वसाहत व पोलीस आयुक्तालयाच्या प्रस्तावांबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी उपाययोजना राबवून नागरिकांचा विश्वास दृढ करण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी जिल्ह्यात मागील दीड वर्षातील गुन्हेगारीत झालेल्या घट व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण केले. पुढील काळातही जिल्ह्यात शांतता राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी २० ते २४ एप्रिल २०२६ दरम्यान पालक व विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

## महात्मा बसवेश्वर जयंतीच्या मिरवणुकीत सहभागी व्हा : अमरनाथ राजुरकर

**नांदेड-** प्रतिवर्षाप्रमाणे अक्षय तृतीयेच्या दिवशी (१९ एप्रिल) क्रांतीसूर्य जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने मोठ्या जल्लोषात साजरी होणार आहे. नांदेड शहरात निघणाऱ्या भव्य मिरवणुकीत नांदेड जिल्ह्यातील व शहरातील हजारो कार्यकर्ते व महात्मा बसवेश्वर प्रेमी सहभागी होणार आहेत, अशी माहिती स्वागताध्यक्ष, भाजपाचे महानगराध्यक्ष तथा माजी



आ. अमरनाथ राजुरकर यांनी दिली. या निमित्ताने सकाळी ८ वाजता शिवलिंगेश्वर मंदिर सिडको येथे ध्वजारोहण, सिडको-हडको भागात मुख्य रस्त्यांवरून सर्व महापुरूषांच्या पुतळ्यास अभिवादन होईल. सकाळी १० वाजता विशालनगर पाटीजवळ अभिवादन होईल. दुपारी १ ते ४ दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मोफत भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून जुना मोंढा टॉवर, नवीन कौठा ते महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्यापर्यंत भव्य दिव्य मिरवणूक निघणार असून जिल्हाभरातून वीरशैव लिंगायत व बसवप्रेमी नागरिक या मिरवणुकीत जल्लोषाने सहभागी होणार आहेत. सायंकाळी ७ वाजता जयंती समारोहाचा समारोपीय कार्यक्रम पार पडणार आहे. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे तर उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत. महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीचे स्वागताध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, अध्यक्ष सोपानराव मारकवाड, कार्याध्यक्ष अनिल पाटील निमटेककर हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून खा. अजित गोपछडे, खा.प्रा. रवींद्र चव्हाण, आ. श्रीजयाताई चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. तुषार राठोड, आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. जितेश अंतापूरकर, आ. राजेश पवार, आ. बाबुराव कोहळीकर, महापौर सौ. कविताताई मुळे, उपमहापौर दिपकसिंह रावत, सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयराव कल्लावार, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभागृह नेता महेश कनकदंडे, राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेट्टे, माजी सभापती संजय बेळगे, नगरसेवक किशोर स्वामी, माजी सभापती व्यंकटराव पा. चांडोळकर, भाजपा जिल्हा प्रवक्ता संतोष पांडागळे, शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, गंगाधर बडुरे, माजी नगराध्यक्ष मुदखेड सुनील शेट्टे, राष्ट्रीय उपाध्यक्ष शिवा संघटना दत्ताभाऊ खंकरे, राज्य सरचिटणीस धन्यकुमार शिवणकर, राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, राज्य प्रवक्ता विठ्ठलराव ताकबिडे, राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, राज्य उपाध्यक्ष कर्मचारी महासंघ संतोष शेटकर, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल माळगे, मराठवाडा प्रमुख विरभद्र बसापुरे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे, नगरसेवक वैजनाथ देशमुख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मोफत आरोग्य शिबिरासाठी दंतरोगतज्ज्ञ डॉ. विवेक टापरे, त्वचारोगतज्ज्ञ डॉ. वर्षा टापरे, पोटविकारतज्ज्ञ डॉ. अभिजीत स्वामी, डॉ. राजेंद्र कागणे, नेत्रचिकित्सा डॉ. विभुते, मधुमेह चिकित्सक डॉ. शिवकुमार धडवई, होमीओपॅथी डॉ. गजानन देलमाडे, जनरल फिजिशियन डॉ. मन्मथ हे तज्ज्ञ डॉक्टर आरोग्य शिबिरात सेवा देणार आहेत. सायंकाळी ४ वाजता होणार्या मिरवणुकीचे उद्घाटन जिल्हा संपर्कप्रमुख अनिल माळगे व इतर मान्यवरांच्या हस्ते होईल. तरी या भव्य मिरवणुकीत व समारोपीय कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष विलास कापसे, संभाजी पा. बुड्डे, रवींद्र पांडागळे, संभाजी पावडे, शुभम घोडके, सौ. नंदाताई पाटील, सौ. सत्यभामा एजगे, महानगराध्यक्ष गजानन कानडे, शहर प्रमुख शिवराज उमाटे, जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर स्वामी, नंदुअप्पा देवणे, शहराध्यक्ष सतीश मठपती, उपाध्यक्षा सविता निमडगे, सरचिटणीस शिवकुमार देशमुख, व्यंकटेश भोगाजे, शहरप्रमुख सौ. नंदाताई कहाळेकर, सौ. ज्योती स्वामी, सौ. पूजा संगेकर, ज्ञानोबा घोडके, प्रा. रामकिशन पालीमकर, निळकंठ चोंडे, दत्तप्रसाद पांडागळे, भीमराव वंटे, नागोराव पाटणे, गणेशराव स्वामी, गंगाराम नरडेले, आनंदराव खंदारे, शिवाजी कहाळेकर, वसंत जारीकोटे, संग्राम काडवदे व सर्व पदाधिकारी शिवा संघटना व महात्मा बसवेश्वर जयंती समिती नांदेड यांनी केले आहे.

## शिक्षक पात्रता परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी मुदतवाढ

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीइटी) २०२६ परीक्षेचे रविवार २१ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २४ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी कळविले आहे. या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी २७ मार्च ते १६ एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि परीक्षार्थी/ उमेदवारांमार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत वाढविण्याबाबतची विनंती लक्षात घेता ही मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.




## 'घाण, दुर्गंधी, रोगराई आणि कागदावरचा विकास !'
### मंजुरीनंतरही काम शून्य; लाखोंच्या निधीवर संशयाची काळी छाया

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १८ एप्रिल -**

शासनाच्या योजना, मंजुरीचे कागद, ठरावांचे ढीग पण प्रत्यक्षात गाव घाणीच्या विळख्यात! प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून, इस्लापूर ग्रामपंचायतीचा कारभार आता थेट संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे.आणि इस्लापूर ग्रामपंचायतच्या सन २०२४/२५ मधील १५ वा वित्त आयोगाच्या बंदित निधी मधिल आराखड्याला जिल्हा परिषद नांदेड कार्यालयाकडून जा. क्र. जिपना/ ग्रा.प.८/२१२४/२०२४ दि.१० जून २०२५ रोजी मंजुरी मिळाली. याआधी ग्रामपंचायतीने दुरुस्तीच्या मंजुरीसाठी ठराव क्रमांक १३ दि.३० ऑगस्ट २०२४ रोजी मंजूर केला, तर पंचायत समितीच्या तांत्रिक समितीने १८ सप्टेंबर २०२४ रोजी आराखड्यालाही मंजुरी दिली.

परंतु कागदोपत्री सर्व काही पूर्ण पण प्रत्यक्षात 'शून्य काम' झाले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत घंटागाडी खरेदी व सेग्रीगेशन शेड उभारणीसाठी १५ व्या वित्त आयोगातून लाखो रुपयांचा निधी मंजूर झाला. मात्र, तब्बल १० महिन्यांहून अधिक



काळ उलटूनही गावात ना घंटागाडी, ना कचरा व्यवस्थापनाची सुविधा मिळाली.

**गाव रोगराईच्या उंबरठ्यावर!**

कचऱ्याचे ढिग रस्त्यावरच साचले, नाल्या तुंबून दुर्गंधीचा विळखा, डेंग्यू, मलेरिया, ताप, त्वचारोगाचा वाढता धोका, लहान मुले व ज्येष्ठ नागरिक सर्वाधिक धोक्यात आले आहे.

**'कागदावर विकास, प्रत्यक्षात विनाश!'**

ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी असून, कामे कागदावर पूर्ण दाखवून निधीचा अपव्यय किंवा थेट हडप झाला का? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

**संशय अधिक गडद करणारे मुद्दे**

मंजुरीनंतरही कामाचा एकही टप्पा सुरू नाही, निधीचा वापर कुठे झाला याबाबत पारदर्शकता नाही, ग्रामपंचायतीकडून कोणतीही स्पष्ट माहिती नाही, स्वच्छता योजनेचा लाभ गावकऱ्यांना मिळालाच नाही

**ठाम मागण्या**

संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करावी, मंजूर निधीचा लेखाजोखा जाहीर करणे, दोषी अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई, रखडलेली कामे तात्काळ सुरू करून पूर्ण करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## विविध विकास कामांसाठी नगरसेवक नेम्मानिवार यांचे निवेदन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ एप्रिल -**

नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ मधील मूलभूत सुविधा व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार यांनी नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार तसेच मुख्याधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनात प्रभागातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सदर निवेदनात प्रभाग क्रमांक ५ मधील मुख्य व्ही.आय. पी. रोडचे सुशोभिकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आधुनिक पथदिवे, दिशादर्शक फलक व सूचना दर्शक बसविण्याची मागणी करण्यात आली असून यामुळे नागरिकांसह बाहेरील नागरिकांना देखील सोयीसुविधा उपलब्ध होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, प्रभागातील विविध ठिकाणी असलेले जुने व निकृष्ट दर्जाचे गतीरोधक अपघातांना कारणीभूत ठरत असल्याने ते तात्काळ काढून टाकून त्यांच्या ठिकाणी नवीन, शास्त्रोक्त पद्धतीने गतीरोधक बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

आदर्श नगर परिसरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून अंतर्गत रस्ते व नाली व्यवस्थेअभावी त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून या भागात पक्के रस्ते व सुसज्ज नाली बांधकाम करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, संपूर्ण एस.व्ही.एम. परिसरातील ले-आऊटमधील मोकळ्या जागांमध्ये वॉल कंपाऊंड उभारून त्या जागांचे संरक्षण करणे तसेच नागरिकांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सभामंडप उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## विरोधकांनी महिलांच्या संसदीय उन्नतीचा मार्ग अडवला : खा. डॉ. अजित गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ एप्रिल -**

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून विरोधकांनी भारतातील तमाम महिलांच्या राजकीय आणि सामाजिक उन्नतीचा मार्ग अडवला आहे विरोधकांना महिलांची उन्नती पाहवत नाही त्यामुळेच त्यांनी अशा प्रकारचे कृत्य केले असल्याची प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे राज्यसभा सदस्य डॉक्टर अजित गोपछडे यांनी व्यक्त केली आहे.

पुढे बोलताना डॉ. अजित गोपछडे यांनी विरोधकांवर तीव्र शब्दांत टीका केली. त्यांनी म्हटले की, महिलांना राजकीय प्रतिनिधित्व देणारे हे विधेयक केवळ कायदा नाही, तर सामाजिक न्यायाची दिशा आहे. मात्र, विरोधकांनी आपल्या राजकीय अहंकारापोटी या ऐतिहासिक संधीवर पाणी फेरण्याचा प्रयत्न केला आहे. संसदेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा देशातील कोट्यवधी महिलांच्या अपेक्षांचा आणि स्वप्नांचा आवाज आहे. लोकशाहीच्या मंदिरात महिलांना समान संधी देण्याचा निर्णय होत असताना, विरोधकांनी निर्माण केलेला गोंधळ हा केवळ संसदीय परंपरेचा अपमान नसून, महिला सक्षमीकरणाविरोधातील विरोधकांचा कुटिल डाव आहे असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान ते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०२९ मध्ये पार पडणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महिला आरक्षणासह निवडणुका होतील अशी भूमिका गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे . त्यामुळे भारतातील तमाम महिलांना लोकसभेमध्ये समान संधी मिळेल असा विश्वासही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

## भोकरमध्ये गूटखा विक्रेत्यावर कारवाई

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १८ एप्रिल -**

येथील मूख्य चौकात असलेल्या दोन गूटखा विक्रेत्यांवर अन्नसूरक्षा विभागाकडून कारवाई करण्यात आली.

शहरातील डॉ.आंबेडकर चौकातील ईमरान गोळी भांडार व के.जी.एन.सूपारी स्टोअर्स या दोन दूकानाचे चालक ईमरानोद्दीन व शेख रज्जाक शेख हबीब हे राज्यातील प्रतिबंधित असलेला गूटखा सूगंधीत तंबाखू पानमसाला सूगंधीत सूपारी विक्रि करण्याच्या उद्येशाने बाळगल्याचे अढळून आले या कारवाईत एकूण ६३ हजाराचा गूटखा मूद्येमाल अन्नसूरक्षा अधिकारी अरुण तम्मलवाड यांनी जप्त करुन संबधितांविरुध्द गून्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी एकास अटक करण्यात आली.पूढील तपास पो.उपनिरिक्षक सूरेश जाधव हे करीत आहेत.अन्नसूरक्षा विभागाच्या कारवाईला न जूमानता गूटखा माफीयांनी राजरोसपणे प्रतिबंधित गूटखा विक्रि करित आहेत.गोदामात साठवलेला प्रतिबंधित गूटखा आपल्या गोळीभांडारात आणून दिवसभरातून लाखो रुपयांच्या गूटख्याची विक्रि केली जाते.गूटखा माफीयांची ज्या भागात गोदामे आहेत त्या गोदामाची चौकशी करण्यात यावी व कायमस्वरुपी गूटखा विक्रि बंद करण्यात यावी अशी मागणी शहरातील नागरीक करीत आहेत.

## संविधान जागर व महिला मेळावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह-२०२६ अंतर्गत आज १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता समाज कल्याण कार्यालय येथील सांस्कृतिक सभागृहात संविधान जागर व महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक आयुक्त शिवानंद मीनगिरे हे होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून महिला व मुलांकरिता सहाय्यक कक्ष, पोलीस मुख्यालय, नांदेड येथील समुपदेशक मोनिका वामन बिरादार उपस्थित होत्या. तसेच समाज कल्याण अधिकारी गजानन नरवाडे व वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक लक्ष्मी गायके यांचीही प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.

## माळेगांव खंडोबा देवस्थानच्या विकासासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर :आ.चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ एप्रिल -**

लोहा तालुक्यातील माळेगांव यात्रा येथील खंडोबा देवसस्थान तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने मंजूर केला असल्याची माहिती कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली.




राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात खंडोबा देवसस्थानला राजायश्रम मिळाला होता. विलासराव मुख्यमंत्री असताना खंडोबा देवस्थानला कोट्यावधी रुपयांचा निधी एकदाच मंजूर करुन देवसस्थान परिसराच्या कायापालटला सुरुवात झाली होती. अशिया खंडातील प्रसिध्द यात्रा म्हणून माळेगांवचा लौकिक आहे. माळेगांव यात्रा खंडोबा देवसस्थान परिसराचा सर्वांगिण विकास करण्याचा विडा आ.चिखलीकर यांनी पहिल्यांदा आमदार होताच उचलला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान मौजे माळेगांव येथे कॉन्फरन्स हालचे बांधकाम करणे, शौचालये बांधकाम, सि.सी.रसत्याचे बांधकाम, रॅम्पचे बांधकाम करण्यासाठी निधीची मागणी ग्रामविकास मंत्र्याकडे केली होती. आ.चिखलीकर यांच्या मागणीची दखल घेवून ग्रामविकास मंत्र्यांनी तातडीने ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीची बैठक दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी बोलावली होती. या बैठकीत माळेगांव यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांचे अंदाजपत्रके व इतर कागदपत्रांची तपासणी करुन समितीने विकास कामांकरीता निधीची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्य शासन ग्रामविकास विभागाने दि. १७ एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णय जारी करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधीतून श्री क्षेत्र खंडोबा देवसस्थान माळेगांव यात्रास्थळाच्या विकासासाठी २ कोटी ५१ लाख १३ हजार रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.


## तुटणाऱ्या नात्यांना दिला आधार; अर्धापूर केंद्र 'आशेचा किरण'

**तभा वृतसेवा**
**नरसी , दि. १८ एप्रिल -**

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांनी गेल्या दीड दशकात कुटुंबसंस्थेला भक्कम आधार देत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. सन २०१२ पासून ते मार्च २०२६ पर्यंत केंद्रात नोंद झालेल्या एकूण २१४९ प्रकरणांपैकी तब्बल १७७८ प्रकरणांमध्ये यशस्वी समेट घडवून पती-पत्नींचे संसार पुन्हा सुरळीत करण्यात केंद्राने मोलाची भूमिका बजावली आहे.



समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांच्या संयमी, संवेदनशील आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अनेक संसार तुटण्याच्या उंबरठ्यावर आलेल्या कुटुंबांना नवसंजीवनी मिळाली आहे. उर्वरित प्रकरणांपैकी काहींनी कायदेशीर फारकत घेतली, काहींना न्यायालयामार्फत पोटगी मंजूर झाली, तर सध्या २२ प्रकरणांवर समुपदेशन प्रक्रिया सुरू असल्याची माहिती तरटे यांनी दिली आहे.



या केंद्रात नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील महिलांना अर्ज करता येतो. येथे येणारी प्रकरणे विविध प्रकारची असतात, व्यसनाधीनता, विवाहबाह्य संबंध, परस्पर संशय, हुंड्याचे प्रश्न, आर्थिक वाद, स्वभावातील विसंगती आदी कारणांमुळे निर्माण झालेल्या कौटुंबिक तणावाचे स्वरूप गंभीर असते. मात्र या सर्व प्रकरणांमध्ये केवळ तडजोड घडवून आणण्यावर भर न देता, परस्पर संवाद वाढवणे, समजूतदारपणा निर्माण करणे आणि विश्वास पुनर्स्थापित करणे यावर केंद्रित पद्धतीने समुपदेशन केले जाते.

समुपदेशन प्रक्रियेत प्रथम पती-पत्नी व दोन्ही कुटुंबांना एकत्र बोलावून प्राथमिक चर्चा केली जाते. त्यानंतर पीडित महिलेची स्वतंत्रपणे समजूत काढून तिच्या अडचणींचा सविस्तर आढावा घेतला जातो. कौटुंबिक हिंसाचार किंवा अन्य तक्रारींच्या अनुषंगाने अर्ज स्वीकारून संबंधित व्यक्तींना संपर्क साधला जातो. पुढे वैयक्तिक व संयुक्त समुपदेशनाच्या माध्यमातून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

यानंतर दोन्ही कुटुंबांची संयुक्त बैठक घेऊन सामंजस्याचा मार्ग काढला जातो. पती-पत्नींच्या स्वेच्छेने हमीपत्र लिहून घेतले जाते आणि समेटानंतरही केंद्रामार्फत नियमित पाठपुरावा केला जातो. महिन्यातून एकदा भेट घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला जातो, तसेच गरजेनुसार मार्गदर्शन व मदतही केली जाते.

**गुण्यागोविंदाने नांदताना पाहणे, हीच खरी कमाई: स्मिता तरटे**

छोट्या-छोट्या कारणांमुळे पती-पत्नींत वाद निर्माण होतात; मात्र संवादाअभावी ते तीव्र होतात. अशा वेळी समुपदेशनातून त्यांना पुन्हा एकत्र आणून आनंदाने नांदताना पाहणे, यापेक्षा मोठे समाधान नाही, असे समुपदेशक स्मिता तरटे यांनी सांगितले.

सध्या प्रलंबित असलेल्या २२ प्रकरणांमध्येही सकारात्मक बदल घडवून आणण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अर्धापूरचे महिला समुपदेशन केंद्र हे केवळ वाद मिटवण्यापुरते मर्यादित न राहता तुटणाऱ्या नात्यांना सावरण्याचे आणि समाजात कुटुंबसंस्थेची वीण अधिक मजबूत करण्याचे कार्य करत आहे.

या समर्पित सेवेमुळे केंद्राने अनेक कुटुंबांचे आयुष्य नव्याने उजळवले असून, समाजात सकारात्मकतेचा संदेश देत 'आशेचा किरण' म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याला सलाम करत, समाजातील विविध स्तरांतून समुपदेशक स्मिता तरटे व गजानन चिंचोलकर यांचे मनापासून अभिनंदन केले जात आहे.

